## जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्रं. - १४** **// विशेष महासभा बैठकीचे कार्यवृत्त //** **दि.१५/११/२०१९**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि. १५/११/२०१९ शुक्रवार रोजी सकाळी .११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर . सौ.सिमा सुरेश भोळे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करून खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा.सौ.सिमा सुरेश भोळे , महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| सोनवणे अश्विन शांताराम | पाटील प्रतिभा सुधिर | महाजन सुनिल सुपडू |
| जोहरे प्रिया मधुकर | पाटील चंद्रशेखर शिवाजी | शेख शबानाबी सादीक |
| नेरकर सरिता अनंत | कापसे मयुर चंद्रकांत | नाईक प्रशांत सुरेश |
| पोकळे दिलीप बबनराव | कापसे प्रतिभा चंद्रकांत | बालाणी भगतराम रावलमल |
| खान रुकसानाबी गबलु | पाटील विजय पुडलिक | अत्तरदे रजनी प्रकाश |
| सोनवणे कांचन विकास | सोनवणे सुरेश माणिक | काळे रेश्मा कुंदन |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | बारी शोभा दिनकर | **आहुजा मनोजकुमार नारायणदास** |
| शिंदे गायत्री उत्तम | शेख हसीनाबी शरीफ | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| बाविस्कर किशोर रमेश | पाटील कुलभुषण विरभान | सोनार रंजना विजय |
| सपकाळे मिना धुडकु | भिल पार्वताबाई दामु | खडके सुनिल वामनराव |
| कोळी दत्तात्रय देवराम | पाटील उषा संतोष | खडके विश्वनाथ सुरेश |
| सपकाळे रंजना भरत | कोल्हे सिंधु विजय | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| कोल्हे प्रविण रामदास | बरडे नितीन मनोहर | देशमुख सुन्नाबी राजु |
| सनकत चेतन गणेश | बेंडाळे उज्वला मोहन | शेख सैईदा युसुफ |
| सोनवणे भारती कैलास | राणे गायत्री इंद्रजित | पटेल इब्राहिम मुसा |
| चौधरी चेतना किशोर | जोशी अनंत हरिश्चंद्र | सोनवणे विक्रम किसन |
| सोनवणे मुकुंदा भागवत | तायडे सुरेखा नितीन | भापसे जिजाबाई अण्णासाहेब |
| भंगाळे विष्णू रामदास | चव्हाण ज्योती बाळासाहेब | कैलास नारायण सोनवणे |
| काळे अमित पांडुरंग | मराठे जितेंद्र भगवान | राजेंद्र नारायण मराठे |
| चौधरी मंगला संजय | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर | महेश रतन चौधरी |
| **अॅड . हाडा शुचिता अतुलसिंह** | पाटील रेखा चुडामण | भागचंद मोतीलाल जैन |
| सोनवणे धिरज मुरलीधर | सोनवणे सुरेखा सुदाम | |
| पाटील सचिन भिमराव | ढेकळे सदाशिव गणपत | |
| चौधरी मनोज सुरेश | पाटील राजेंद्र झिपरु | |

सदर सभेस मा. आयुक्त , डॉ.उदय टेकाळे , मा.उपायुक्त.श्री.मिनानाथ दंडवते , मा.उपायुक्त.श्री.उत्कर्ष गुटे , मा.उपायुक्त.श्री. अजित मुठे, मुख्यलेखापरिक्षक, श्री.संतोष वाहुळे , नगरसचिव श्री.सुनिल गोराणे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते .

सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.

सभेच्या सुरूवातीस वंदेमातरम ने सुरूवात करण्यात आली.

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता सन्मा .सदस्या सौ. काळे दिपमाला मनोज , कोल्हे ललीत विजय , सौ.देशमुख प्रतिभा गजानन यांचे रजेचे अर्ज आलेले असुन ते . मा. पिठासिन अधिकारी यांनी मंजूर केलेले आहेत.

**नगरसचिव :- विषय क्रं:- १)** दि.२९/०८/२०१९ रोजी झालेल्या महासभेचे कार्यवृत्त कायम करणे.
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावो.

**श्री.धिरज सोनवणे :-** प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

असा ठराव करणेंत येत आहे की, दि.२९/०८/२०१९ रोजी झालेल्या महासभा बैठकीचे कार्यवृत्त कायम करणेंस मान्यता प्रदान करणेंत येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २१२ पारित करण्यात आला.**

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**
**अनुमोदक :- सोनवणे धिरज मुरलीधर**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २)** स.नं.१४४/३, अ ३ मधील रस्ते खडीचे करणे व इतर कामे करणे कामी मक्तेदारांनी मनपात भरलेली कालबाहय इसारा अनामत एकुण रक्कम रु.९०,६००/- मात्र परत करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री.धिरज सोनवणे :-** प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २१३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, स.नं.१४४/३, अ ३ मधील रस्ते खडीचे करणे व इतर कामे करणे कामी मक्तेदारांनी खाली नमूद केलेप्रमाणे मनपात इसारा रक्कम भरलेली होती सदरची कामे म.न.पा.निधी अंतर्गत पुर्ण करण्यांत आलेली असल्याने व सदरच्या इसारा अनामत रक्कमेस तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने मनपा जनरल फंडात जमा करण्यात आलेली मक्तेदार श्री.टि. ए. पाटील यांची खालील प्रमाणे अ.नं. १ ते १२ मध्ये नमूद केलेली कालबाहय सुरक्षा अनामत एकुण रक्कम रु.९०,६००/- परत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पावती क्र. | दिनांक | इसारा अनामत रक्कम रु. | सन | डे-बुक पा.नं. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २२२०१ | १४-१०-२०१० | १२०० | २०१०-११ | १४९ |
| २ | २०९९९ | १४-१०-२०१० | २३०० | २०१०-११ | १४९ |
| ३ | २१००० | १४-१०-२०१० | २४०० | २०१०-११ | १४९ |
| ४ | २२२०२ | १४-१०-२०१० | ९०० | २०१०-११ | १४९ |
| ५ | २२२०३ | १४-१०-२०१० | १५०० | २०१०-११ | १४९ |
| ६ | २०३७७ | २७-०८-२०१० | १५००० | २०१०-११ | ११६ |
| ७ | २०३७६ | २७-०८-२०१० | १५००० | २०१०-११ | ११६ |
| ८ | १२१३९ | ०४-०५-२०१० | २०५०० | २०१०-११ | ०३४ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | ८२८७ | १५-१२-२०११ | १००० | २०११-१२ | ०८४ |
| १० | २७०९ | २०-०८-२०११ | ७३०० | २०११-१२ | १४६ |
| ११ | ३८१६२ | १८-०६-२०११ | १०५०० | २०११-१२ | ०८५ |
| १२ | ३५९८१ | ०९-०६-२०११ | १३००० | २०११-१२ | ०७७ |
| | | एकूण - | ९०६०० | | |

सदर प्रकरणी प्रशासनाने शासन आदेश/निर्देशाप्रमाणे नियमानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**
**अनुमोदक :- सोनवणे धिरज मुरलीधर**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ३)** शासनाच्या IHSDP योजनेतील ७६ घरकुल वाटप करणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.दिलीप पोकळे :-** मा.उपायुक्त यांच्या अधिपत्याखाली शहर अभियंता , सहा.संचालक , नगररचनाकार , शाखा अभियंता श्री. सोनगीरे यांची समिती गठीत करून लाभार्थींची शहानिशा करून खात्री करून विषयाला मान्यता देण्यात यावी.

**श्री. सुरेश सोनवणे :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** आता आपण जी घरकुल योजना केलेली आहे हे आपण दुध फेडरेशनचे जे घरकुल काढत होते त्यांच्यासाठी आपण ती आणलेली आहे आपण बाकी काही लोकांना घरकुल वाटप केलेले आहे त्यातील काही लोकं बाकी आहेत ते सर्व लोकं चार वर्षापासुन रस्त्यावर आहेत त्यांचाच विचार करण्यात यावा. आपण मगाशी अपंग लोकांना देवु असे देवु परंतु आपण ज्यांच्यासाठी ते ठेवलेल आहे त्याचं लोकांना ते घरकुलांची वाटप करण्यात यावी व ठरावाला मान्यता देण्यात यावी.

**श्री. दिलीप पोकळे:-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री. सुरेश सोनवणे :-** प्रस्तावास माझे अनुमोदन आहे **.**

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २१४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, शासनाच्या IHSDP योजने अंतर्गत मनपा मालकीच्या पिंप्राळा गट.नं. २१४ पार्ट येथे ४७२ घरकुलांचा प्रस्ताव मंजुर झालेला होता. व त्यातील २५२ घरकुले पहिल्या टप्यात बांधकाम पूर्ण करुन लाभार्थ्यांना वाटप करण्यात आलेले आहे. उर्वरीत घरकुलांपैकी जागेच्या अडचणीमुळे फक्त ७६ घरांचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. व या योजने अंतर्गत मंजुर झालेल्या ४७२ लाभार्थींच्या आदीतील यापूर्वी ज्या २५२ लाभार्थ्यांना घरकुलांचे वाटप झालेले आहे त्यांची नावे वगळुन उर्वरीत सर्व लाभार्थींचे यादीतुन ७६ घरकुलांचा लकी ड्रॉ काढण्यास व त्यानुसार घरकुलांचे वाटप करण्यास या पूर्वी महासभा ठराव क्र. ३९ दि. ०७/१२/२०१८ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली होती. त्या नुसार वेळ व दिनांक निश्चित करण्या कामी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. व त्यावर तत्कालीन आयुक्तांनी महापौरांची वेळ व दिनांक घेवुन कार्यवाही करण्या बाबत अभिप्राय दिलेले होते.

या पूर्वी २५२ घरकुलांचे वाटप करण्या करीता तत्कालीन महासभेने महासभा ठराव क्र. ७६५ दि. २६/०९/२०१७ अन्वये ठरवुन दिलेल्या धोरणा नुसार जळगांव शहर हगणदरी मुक्त करणे कामी पिंप्राळा गट.नं. २१४/२ या जागेवर १८ मीटर डि.पी. रस्त्यावर झोपड्यांमध्ये रहिवास करणाऱ्या सर्व झोपडी धारकांना घरकुल वाटप करण्यात यावे तसेच दुध फेडरेशन जवळील झोपडी धारकांचे निवेदना नुसार ७६ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाल्यावर त्याचेशी चर्चा करुन त्यांचे सहमतीने ७६ घरकुलांचे वाटप करण्यास मान्यता देण्यात आलेली होती. व उर्वरीत १५६ घरकुलांचे लाभार्थी निश्चित करुन त्यांचा प्रधानमंत्री आवास योजनेत समावेश करुन त्यांच्या नावानीशी प्रस्ताव शासनास पाठविण्यास मंजुरी देण्यात आलेली होती.

तत्कालीन घरकुल वाटप वेळी डि.पी. रस्त्यावर राहत असलेल्या एकुण ३३४ लाभार्थ्यांपैकी २५२ लाभार्थ्यांना घरकुलांचा ताबा देण्यात आलेला असल्याने उर्वरीत ८२ लाभार्थी यांनी डि.पी. रस्त्यावरील आपल्या झोपड्या काढुन घेतल्याने मनपास हगणदारी मुक्त करण्यासाठी सहकार्य केलेले असल्याने या ७६ घरकुलांच्या वाटपासाठी फक्त याच ८२ लाभार्थ्यांचा विचार करणे आवश्यक असल्याने या ८२ लाभार्थ्यांना लकी ड्रॉ पध्दतीने या ७६ घरकुलांचे वाटप करण्यात यावे. तसेच उर्वरीत लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत समाविष्ट करुन त्यांना देखील घरकुलांचा लाभ देण्यात यावा.

याबाबत उपायुक्त यांच्या अधिपत्याखाली शहर अभियंता, प्रभाग अधिकारी, नगररचनाकार, शाखा अभियंता श्री.चंद्रकांत सोनगीरे यांची समिती गठीत करण्यात येत असून सदर समितीने लाभार्थीकडे घरे नसल्याची खात्री करुन उपरोक्त प्रमाणे घरकुल देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सदर प्रकरणी प्रशासनाने शासन आदेश/निर्देशाप्रमाणे नियमानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- पोकळे दिलीप बबनराव**
**अनुमोदक :- सोनवणे सुरेश माणिक**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ४)** जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मध्ये आरक्षण क्र.१३२, ' प्राथमिक शाळा व क्रिडांगण' अंतर्गत मौजे मेहरुण शिवार स.नं.४५४/२अ या जमिनी पैकी बाधीत जमिनीचे भुसंपादना बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** महापौर महोदया प्रत्येक महासभेला किंवा दोनएक महासभेला हा भुसंपादनाचा विषय परत परत येत असतो आज हा विषय कमीत कमी ५१२८२७५५/- रूपयांचा विषय आहे खरोखर आपल्याला आवश्यक आहे का ही जमीन संपादन करणेची बरोबर आहे की , आज आपल्याकडे किती शाळा बंद पडताहेत मोठमोठया शाळा आहेत ऊर्दु म्हणा , मराठी म्हणा आपण त्यांच्यावर लक्षच देत नाहीत आपल्याकडे शिक्षक कमी आहे त्याच्यावर खर्च करीत नाहीत उठले की जळगांव करांचा जो पैसा आहे तो फीजुल खर्च करत आहे आपण त्याचा अभ्यास करायला पाहीजे आपण सद्या सत्तेत आहेत . मागच्या वेळी १० कोटी रूपये आपण असेच दिले आताही हा ५/६ कोटींचा विषय आहे म्हणजे आज जळगांव कर खडडयांमुळे हैराण आहेत , साफसफाईचे बारा वाजलेले आहे , कोणीही लक्ष द्यायला तयार नाहीये त्याच्याकडे त्याची चाबी आहे ते चालु आहे तर आम्ही फक्त कर भरायचे का आम्हाला मुलभुत सुविधा कधी मिळणार म्हणजे आमचे जे पैसे घेतात म्हणजे एखादे घर
**श्री.कैलास सोनवणे :-** तुम्ही शांत बसा .
**श्री.ईब्राहीम पटेल :-** नाही अप्पा मला बोलु द्या .
**श्री.कैलास सोनवणे :-** आता जो भुसंपादनाचा विषय आहे तो वेगळा आहे .तुम्हाला बोलु दिले जाईल आधी विषय होवुन जाऊ द्या लागलेतर तासभर बोला .
**श्री.ईब्राहीम पटेल :-** नाही अप्पा जळगांव करांच्या पैशाविषयी बोलतोय मी सभागृहामध्ये मांडतोय. मागच्या वेळेस आपण हा ठराव तहकुब ठेवला होता आता ही हा ठराव तहकुब ठेवावा.
**मा.उपमहापौर :-** तहकुब जर ठेवला तर तो आपोआप मंजुर होऊन जाईल. तहकुब नाही ठेवता येतो हा विषय.
**श्री.भगत बालाणी :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा व टि.डी.आर देण्यात यावा.
**श्री. दिलीप पोकळे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २१५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मध्ये आरक्षण क्र.१३२, ' प्राथमिक शाळा व क्रिडांगण' अंतर्गत मौजे मेहरुण शिवार स.नं.४५४/२अ या जमिनी पैकी बाधीत

जमिनीचे भुसंपादना म.प्रा. व न.र.अधिनियमाचे कलम १२७ नुसार खरेदी सुचना जमिन मालक श्री.रविंद्र मधुकर घुगे व इतर यांनी नियोजन प्राधीकरणास दिलेली आहे मात्र महानगरपालिकेची आर्थिक स्थितीचा विचार करता जमिन मालक श्री.रविंद्र मधुकर घुगे यांना उक्त बाधीत जमिनीचे भुसंपादनासंबंधी महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बघता आर्थिक मोबदला देण्याऐवजी टि.डि.आर. देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- बालाणी भगतराम रावलमल**

**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ५)** गिरणा पाणी पुरवठा योजने अंतर्गत गिरणा पंपींग, जलशुध्दीकरण केंद्र (सावखेडा) व दापोरा पंपींग येथे सुरक्षा रक्षक नेमणूक करणे, तसेच तेथील मशिनरींचा लिलाव करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** या गिरणा पंपीग जलशुध्दीकरणच्या ठिकाणी ज्या जुन्या मशिनरी व वस्तु आहे त्याचा लिलाव करण्याचा प्रस्ताव या ठिकाणी मान्य केलेला होता. आता त्या ठिकाणी जे आपण सुरक्षा रक्षक म्हणत आहात. त्या ठिकाणी काही कायम कर्मचारीपण ठेवलेले आहे. तर सुरक्षा रक्षक का हवे आहे तेथे.

**श्री.सुनिल भोळे :-** जलशुध्दीकरण आणि गिरणा पंपींग या ठिकाणी आपण १२ कर्मचारी ठेवलेले आहे. तर त्यांना काढुन आपण गिरणा पंपींग आणि उमाळा जलशुध्दीकरण या ठिकाणी सुरक्षा रक्षक ठेवणार आहे. तेथील प्रत्येक कर्मचारीचा आज पगार रु.३०,०००/- आहे. तर प्रति सुरक्षा रक्षक रु.१२,०००/- देऊन आपण त्यांच काम निम्या खर्चात करणार आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** मा.आयुक्त साहेब आपण त्या ठिकाणी वॉटर पार्क उभारण्यासाठी जयकुमार भाऊ, गिरीष महाजन व राजु मामा यांच्या माध्यमातुन पत्र व्यवहार करुन कलेक्टर ऑफिस मधुन प्रस्ताव सादर करणेसाठी आपल्याला पत्र मिळाल. त्यासाठी आपण आर्किटेक्टची नेमणुक केलेली आहे का साहेब ?

**श्री.एस.एस.भोळे :-** हो नेमणुक केलेली आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** त्याला वर्कऑडर दिली का ?

**श्री.एस.एस.भोळे :-** नाही. आम्ही त्याला सांगितले की, जे काही प्रस्ताव असेल ते त्यांनी आम्हाला सादर करावा.

**श्री.जितेंद्र मराठे :-** विना वर्क ऑडरचे तो प्रस्ताव कसा सादर करणार.

**श्री.एस.एस.भोळे :-** त्याच्या खर्चाचा अंदाज तरी यायला पाहिजे आपल्याला.

**श्री.जितेंद्र मराठे :-** मला सांगा जर मला काही आजार आहे की माझी छाती दुखत आहे किंवा पोट दुखत आहे. आणि डॉक्टरांनी सांगितले की, तुमच पोट दुखत आहे. तर मी असे सांगणार का की, तुम्हाला फी का द्यायची कशी द्यायची तुम्ही सांगा.

**मा.आयुक्त :-** मा.महापौर, मा.उपमहापौर आणि सन्मा.सभागृह या विषयाच्या संदर्भात आमची त्या आर्किटेक्टशी चर्चा झाली आपणही त्यावेळेस होता.सन्मा.आमदार साहेब सुध्दा त्यावेळेस होते. हा प्रोजेक्ट वेगळया स्वरुपाचा आहे. रुटीनचा जर एखादा पार्क किंवा गार्डन असेल तर कन्सेप्ट क्लियर असतं. त्यामुळे आम्ही त्यांना सांगितले होते की, तुम्ही दोन तिन थिम आम्हाला प्रिझेंट करा. त्यापैकी कुठली थिम चांगली आहे आपण ते बघु आणि मग वर्कऑडर देऊ. सुरुवातीला जी थिम द्यायची आहे त्याला काही खुप वर्क कराव लागतं असे नाही. फक्त कन्सेप्ट क्लियर पाहिजे. ते लक्षात आले की वर्कऑर्डर देऊ. वर्क ऑर्डर दिली की निधी, ते येण्याचा विषय मग त्याचे मिटर चालु होतं. ते कन्सेंप्ट क्लीअर करण्यासाठी आपण त्याला सांगीतले होते आणि त्यानी मान्यही केलं होत पण त्यानंतर ते काही आले नाही.

**श्री.जितेंद्र मराठे :-** टेंडर चालु होतांना , मला एक सांगा त्याला वर्कऑर्डर दिल्याशिवाय तो क्लीअर करेल कसे काय , सादर केल्यानंतर तुम्ही त्याला काम देणार आहेत का.

**मा.आयुक्त :-** त्याचे कन्सेंप्ट जर चांगले असेल मी मगाशीही सांगीतले .

**श्री.जितेंद्र मराठे :-** आपल्याकडे पैसे नाहीयेत तर मग आपण मनपा फंडातुन द्याना काबर अडवता पैसे द्यायला
**मा.आयुक्त :-** नाही नाही पैश्याला नांव नसते शेवटी पैसे हे मनपा फंडातुन किंवा निधीतुन दिले जातात .
**श्री.जितेंद्र मराठे :-** साहेब आता पैश्यावरून तुम्ही सांगता आता पैश्यातुन खर्च वाढणार नाही आता तिथेपण आपल्याला पैसे द्यावे लागतील.
**मा.आयुक्त :-** बघतो मी
**श्री.जितेंद्र मराठे :-** नाही बोलु नका पैश्यांवरूनच बोलतोय ना आपण त्याला फी द्यायची मग सोलर सिस्टिम आपण लावयची ना साहेब त्याच्यातुन ५० टक्के बचत होणार आहे भविष्यात. आपल्याला भेटलो मी, पत्र व्यवहार केला.
**मा.आयुक्त :-** ठिक आहे. त्याचा घेऊ ना प्रस्ताव.
**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौर साहेबा या प्रश्नाच समाधानकारक उत्तर मिळालेल नाही. वर्क ऑर्डर दिल्या शिवाय कसे काम होईल. तो आर्किटेक्ट म्हणतो मला वर्क ऑर्डर मिळाल्या शिवाय कसे डिझाईन्स देणार. वरतुन पैसे आलेले आहे पण आपण पैसे खर्च करायला तयार नाही.
**मा.उपमहापौर :-** चर्चा करुन अहवाल सादर करा.
**श्री.जितेंद्र मराठे :-** वर्क ऑर्डर दिल्या शिवाय कोणताही आर्किटेक्ट काम करणार नाही.
**श्री.सदाशिव ढेकळे :-** मशिनरीच्या लिलावाच्या संदर्भात प्रस्ताव दिलेला आहे. मला सांगा मशिनरी आहे का तिथे ?
**श्री.सुनिल भोळे :-** सर्व मशिनरी आज ही त्या ठिकाणी लावलेली आहे.
**श्री.सदाशिव ढेकळे :-** माझ्या माहिती प्रमाणे बरीच मशिनरी त्या ठिकाणाहुन चोरी झाली.
**श्री.सुनिल भोळे :-** नाही त्या ठिकाणी सर्व मशिनरी व्यवस्थीत आहे.
**श्री.सदाशिव ढेकळे :-** मला सांगा आपल्याकडे आहे का आधी किती होती आणि आता किती आहे रेकॉर्ड.
**श्री.सुनिल भोळे :-** हो आहे रेकॉर्ड आहे.
**श्री.सदाशिव ढेकळे :-** मला माहिती मिळाली आहे की तेथुन बरेच मशिनरी चोरी गेली.
**श्री.सुनिल भोळे :-** पहिले फक्त एक कॅाईल चोरी गेली होती. त्याबाबत आपण कमप्लेंट पोलिस स्टेशनला दिलेली आहे.
**श्री.सदाशिव ढेकळे :-** जे काही चोरी गेली तर त्याची फिर्याद दिलेली आहे का ?
**श्री.सुनिल भोळे :-** हो फिर्याद दिलेली आहे.
**श्री.सदाशिव ढेकळे :-** मागेपण माझ्या वार्डातील सार्वजनिक शौचालय मधील काही दरवाजे चोरीला गेले होते मी पोलिस स्टेशनला कमप्लेंट ही दिली. पण त्या कमप्लेंटचा पाठपुरावा करायला पाहिजे. आता सर्व मशिनरी त्या ठिकाणी आहे असे हे सांगत आहे. परंतु आर्धी मशिनरी चोरीला गेली अशी माझी माहिती आहे.
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** साहेब तेथील पाईपचे पाईप चोरीला गेलेले आहे. लोकांनी तोडुन तोडुन घेऊन गेले.
**सौ.उज्वला बेंडाळे :-** तेथे भरपुर जागा आहे तर तिथे माणुस पाईप काढुन ठेवु शकतो का ?
**श्री.सुनिल भोळे :-** जागा ही नाही मॅडम त्या ठिकाणी आणि शक्य ही नाही. आणि ही संपुर्ण पाईपलाईन काढण म्हणजे आपल्या ज्या स्कीम चालु होत्या त्या अलायमेंट करणे फार गरजेचे आहे आणि आपण जाहीर लिलाव करतांना त्यांचा फीक्स रेटवर जाहीर लिलाव करणार आहे . आपण त्याचे दर ई / निविदेचे मागविणार ते आपण बिड सकट मागविणार आहे.
**सौ.उज्वला बेंडाळे :-** ती प्रोसेस लवकरात लवकर करा म्हणजे काय .
**श्री.सुनिल भोळे :-** आता याला मंजुरी मिळाली की तात्काळ त्याच्यावर कार्यवाही करण्यात येईल.
**सौ.उज्वला बेंडाळे :-** चालेल.
**श्री.जितेंद्र मराठे :-** प्रशासनाच्या प्रस्तावानुसार मान्यता देण्यात यावी .
**सौ.बेंडाळे उज्ज्वला :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २१६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, गिरणा पाणी पुरवठा योजने अंतर्गत गिरणा पंपींग, जलशुध्दीकरण केंद्र (सावखेडा) व दापोरा पंपींग येथून शहरास पाणी पुरवठा केला जात होता. सन २००९ पासून वाघुर पाणी पुरवठा योजना सुरळीत झाल्याने तसेच गिरणा पाणी पुरवठा योजनेत गिरणा नदीवरुन पाणी साठा आरक्षण समाप्त झाल्यामुळे सदर योजना बंद आहे. सदर योजनेवरुन पाणी पुरवठा बंद जरी असला तरी तेथील मनपा इमारती, मशिनरी, गोडावून इ.मालमत्तेचे देखभाल करणे कामी मनपाचे कायम कर्मचारी नेमण्यात आले आहेत. गिरणा पंपींग, सावखेडा पंपींग येथिल मशिनरी व जागेचे संदर्भात धोरणात्मक निर्णय घेणेकामी महासभेकडे प्रस्ताव पाठविण्यांत आलेला होता. तथापी या प्रस्तावानुसार सदयस्थितीत असलेली मशिनरी कॉलेजचे विदयार्थ्यांना पाहणे करीता ठेवणे व या जागेचा पर्यटन स्थळ म्हणून विकास करणे बाबत महासभा

ठराव क्र.८६ दि.२१/०२/२०१९ अन्वये धोरण मंजूर झालेले आहे. जिल्हा नियोजन अधिकारी यांचेकडील पत्र क्रं.१५०४ दि०१/०७/२०१९ अन्वये गिरणा पंपींग येथे पर्यटन स्थळ विकसीत करणे बाबत अंदाजपत्रक सादर करणे कामी सुचना प्राप्त आहेत. गिरणा पंपींग येथील जागेचे सातबारा उताऱ्यावर गिरणा वॉटर वर्क्स नांव आहे. सावखेडा जलशुध्दीकरण केंद्राच्या जागेच्या उताऱ्यावर परिसर अभियांत्रिकी विभागाचे नांव असून दापोरा पंपींग येथील जागा ही कार्यकारी अभियंता, परिसर अभियांत्रिकी विभाग यांचे नांव ७/१२ चे उताऱ्यावर आहे.

प्रशासनाने प्रस्तावित केले प्रमाणे गिरणा पाणी पुरवठा योजने अंतर्गत गिरणा पंपींग, जलशुध्दीकरण केंद्र (सावखेडा) व दापोरा पंपींग येथे मंजूर दराने सुरक्षा रक्षक नेमणूक करणेस व तेथील मशिनरींचा लिलाव करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर प्रकरणी प्रशासनाने शासन आदेश/निर्देशाप्रमाणे नियमानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- मराठे जितेंद्र भगवानराव**
**अनुमोदक :- बेंडाळे उज्वला मोहन**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ६)** जळगांव शहर महानगरपालिकेच्या मालकीचा भटक्या जनावरांचा कोंडवाडा ५ वर्षे कालावधीसाठी देखभालकरीता देणे करीता संस्थेची ई-निविदाव्दारे निवड करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मा.महापौर , हा जो विषय आहे भटक्या जनावरांचा यातील काही जनावरे जी आहेत ती शेतकऱ्यांची आहेत म्हणजे काय आहे काही शेतकरी जे आहेत त्यांची जनावरे भटकुन जातात ते सुध्दा ते लोक ठेवुन घेतात व मनमानी कारभार करतात हे तुम्ही लक्षात घ्या , म्हणजे काय होते की ते म्हणतात की २/३ वेळा त्यांना सांगतात की तुम्ही तुमचे जनावर घेवुन जा नाहीतर आम्ही तुमच्या जनावराचा लिलाव करू. ही जी पध्दत वापरतात त्याच्यावर तुम्ही कारवाई कराव आणि हया ज्या आहेत बांलगंधर्व जवळ ज्या ठेकेदाराला तुम्ही ठेका देणार आहेत त्यापुर्वी त्याला म्हणावे की जागा सुध्दा तुमचीच राहील व त्याच्यानंतर त्याला ठेका देण्यात यावा. हा ठेका कशा पध्दतीने देता आहेत ते सांगावे.

**श्री. धिरज सोनवणे :-** टेंडर देतांना जे जनावरे जप्त करतात ते त्याच्याकडुन किती रक्कम घेतली पाहीजे हे आपल्याकडुनही ठरवली आहे का की किती रक्कम घेतली पाहीजे कारण नागरीकांच्या अशा तक्रारी आहेत की त्यांच्या जनावरांचा २ हजार ते ५ हजार दंड घेण्यात येतो आणि त्या जनावराची किंमत ५ हजार रू. राहते ते सोडतांना त्यांना ती रक्कम महागी होते तर आपण तसे काही ठरवुन दिलेले आहे का.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** जे ठरवुन आपण ज्या ठेकेदाराला देतात आणि ठेका देतांना त्याला असे करा की जागा त्याने उपलब्ध करून घ्यायची आहे आणि तेवढे त्याला रेट वाढवुन द्यायचे .

**श्री. धिरज सोनवणे :-** रेट जर ठरविला असेल तर तो सांगण्यात यावा किंवा काय ठरवले आहे त्याची माहिती द्यावी. दंडाची रक्कम .

**डॉ.विकास पाटील :-** सदर टेंडर प्रोसेस मध्ये आहे आणि त्याचे दर आपण प्रति जनावर १२००रू ठरविलेले आहेत आणि लहान असेल तर ६०० रू. आहेत.

**श्री. धिरज सोनवणे :-** त्याच्या अगोदर आपण त्या लोकांना आपण जी नोटीस वगैरे पाठवतो की आम्ही तुमचे जनावरे जप्त केलेले आहेत ते घेवुन जा किंवा काय.

**डॉ.विकास पाटील :-** नोटीस आपण काढतो पण मोकाट जनावरे असतात म्हणुन आपण काढतो .

**श्री. धिरज सोनवणे :-** १२०० रू. पण जास्त होतात एका जनावराचे साहेब .

**डॉ.विकास पाटील :-** ते कसे आहे मोकाट जनावरे असतात म्हणुन आपण हे आहे आणि जो पर्यंत तपास लागत नाही तो पर्यंत आपण काही सांगु शकत नाही आणि त्यासाठी मोठे जनावर असेल तर १२०० आणि लहान असेल तर ६०० रू. आहेत.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** साहेब शेतकच्यांची जनावरे सुध्दा फीरतात आपण ती काळजी घेतली पाहीजे.

**डॉ.विकास पाटील :-** होय ती काळजी आपण घेतलेली आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** त्याच्यात तुम्ही अशी तरतुद करा की शेतकऱ्यांची जनावरे असतील तर त्याबाबतीत काहीतरी तरतुद करा.

**मा.आयुक्त :-** नाही पाटील साहेब ते म्हणताहेत की शेतकऱ्यांचे असे काही वेळेला चुकुन जे येतात त्याच्या संदर्भात खात्री करून घ्यावी. त्याच्याप्रमाणे जी काही त्यांना नोटीस द्यायची आणि ज्यावेळेला आपण लिलाव करतो त्याच्या आधी आपण नोटीस चिटकवतो तर त्याबाबतीत खात्री करायला त्या कॉन्ट्रक्टरला द्या.

**श्री.अमर जैन :-** साहेब असे काहीच होत नाही आणि ऐकत नाही आता मागच्या हप्त्यातीलच गोष्ट आहे. आपला ठेकेदार त्याठिकाणी ती गाय उचलतो गाडीत टाकतो आणि तिथे गेल्यावर तो म्हणतो २ हजार असतील तर बोलायचे ही पध्दत आहे माझा स्वत:चा अनुभव आहे .आमचं पिंप्राळा हे ग्रामीण आहे तिथं फारच गरीब लोक राहतात , अप्पा गरीब लोकांच्या गायी म्हशी आहेत .

**मा.आयुक्त :-** नाही मोकाट जनावरे म्हटंल्यानंतर ती गरीबाची आहे की श्रीमंतांची आहेत हे आपल्याला माहिती नसते .

**श्री.अमर जैन :-** बरोबर आहे साहेब एकदम मान्य आहे . चला माझा विषय ऐकुन घ्या माझे म्हणणे एकच आहे चुकुन जर एखादा जनावर त्या साईटला आला कितीही केले तर ती गाय आहे.

मा.आयुक्त :- अश्या प्रकरणात असे जर काही झाले तर तुम्ही आरोग्याधिकारीशी संपर्क करु शकता.

**श्री.अमर जैन :-** आमची सोसायटी ग्रामीण सोसायटी आहे. हे लोकं तेथे जाऊन दादागीरी करतात. माझा पर्सनल अनुभव आहे साहेब. एका मित्राची गाय रस्त्यावर पकडली, मी स्वत: त्यांना फोन केला तर त्यांनी सांगितले की, त्यांना तेथे कोंडवाड्यावर पाठवुन द्या आम्ही पाहुन घेऊ. त्याच्याशी बिना पावतीचे रु.१५००/- घेतलेले आहे.

**आरोग्याधिकारी :-** या वेळेस झाल असेल पुढच्या वेळेस लक्ष ठेवु.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** महापौर साहेबा कोंडवाड्याचा उपयोग अतिशय चांगला आहे. रस्त्यावर जे कर्मचारी बसतात ट्रॅफिकला अडचण होते. परंतु प्रत्येक्षात काय होतं.आपण जे कॅन्ट्रॅक्टर नेमतो त्याला त्याचे टार्गेट पुर्ण करायचं असतं. शहरामध्ये जे गांव आहे, पिंप्राळा गांव आहे ,मेहरुण गांव आहे. खेडी गांव आहे. जुनेगांव आहे तर शेतकरी वर्ग या ठिकाणी मोठया प्रमाणात आहे. आणि त्यांचे कडे गुरेढोरे आहे. जेव्हा ते सकाळी ढोरे सोडता आणि शेतात घेऊन जातात. आणि रस्त्यावर जाणारे ढोरं जे आहे ते मोकाट आहे असे गृहित धरुन त्यांना घेऊन जातात.आपल्या ह्या नागरीकांना शेतकऱ्यांना त्रास होतो. याच्यात आपण एक अट टाका की, मेहरुण, पिंप्राळा, खेडी या गावातल्या ढोरे आपण पकडु नये. बसलेले आहे तर ठिक आहे. परंतु जातांना ढोरांना पकडु नये.

**मा.आयुक्त :-** जेव्हा शेतकरी जनावरे शेतात घेऊन जातो तेव्हा त्यांच्या मागे एक माणुस असतो, त्यामुळे ते मोकाट असुच शकत नाही. कारण ते दक्षता घेतात. आणि आपण मेहरुण, पिंप्राळा खेडी येथील जनावरे पकडु नये असे करता येणार नाही. आरोग्याधिकारी त्यांना सांगा आणि दक्षता घ्या.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** हे लोकं ऐकत नाही. आणि जे जनावरे घेऊन जाणारा माणुस आहे त्याच्याशी भांडण करता, काही भांडण मी स्वत: सोडविले आहे. शेतकऱ्यांना त्रास होतो नेहमी.

**आरोग्याधिकारी :-** जे शेतकरीचे ढोरे असतील त्यांना पकडणार नाही पण जर मोकाट फिरत असतील त्यांना पकडणार.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** त्यांच्या मागे माणुस असतो परंतु ते मक्तेदाराचे लोकं त्याना ऐकत नाही भांडण करतात. आणि दोन वर्षांचा करार करा असे म्हणणे आहे.

**मा.आयुक्त :-** पाच वर्ष न करता तिन वर्ष करा.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** महापौर साहेब , आयुक्त साहेब आज विद्यार्थांना , लाहन लहान मुलांना त्रास होतोय गुरांमुळे , तर आपण कुठेतरी काही चेक करत आहेत का .

**मा.आयुक्त :-** आपण उपाययोजना करतोय .

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा व पाच वर्षांचा न करता तिन वर्षांचा करण्यात यावा.

**श्री.ढेकळे सदाशिव :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २१७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिकेच्या मालकीचा भटक्या जनावरांचा कोंडवाडा ५ वर्षे कालावधीसाठी देखभालीसाठी देणे करीता स्थायी समिती ठराव क्रं.१५४ दि.०५/०९/२०१४ चे मंजूरीने स्व. सौ. सुगनबाई शिवप्रकाश चांगरे गो-सेवा संस्था, मोहाडी, ता.जि. जळगांव यांना कोंडवाडा देखभाली करीता करारनामा अटी शर्तीनुसार देण्यात आलेला होता. सदर संस्थेस देखभालीसाठी आणि संस्थेस कोंडवाडयाच्या मिळणाऱ्या रक्कमेवर २२% प्रमाणे देणाऱ्या स्वामित्व शुल्कानुसार सदरचा कोंडवाडा दि.१२/०९/२०१४ पासून देण्यात आलेला होता. सदर मक्त्याचा कालावधी दि.११/०९/२०१९ रोजी संपुष्टात येत आहे.

तसेच सदर कोंडवाडा पुनश्च निविदा प्रसिध्द न करता म.न.पा. मार्फत सुरु करावयाचे झाल्यास म.न.पा.चे मनुष्यबळानुसार खालील प्रमाणे वार्षिक खर्च अपेक्षीत आहे. तसेच जनावरांच्या खावटीचा खर्च सुध्दा खालील प्रमाणे येईल.

| अ. क्रं. | कर्मचारी वर्ग | संख्या | मासिक खर्च | वार्षिक खर्च |
|---|---|---|---|---|
| १. | पौंडकिपर | ०२ | प्रति कर्मचारी रु.३४,२१८/- | ८,२१,२३२/- |
| २. | मोकादम | ०१ | प्रति कर्मचारी रु.२८,५२८/- | ३,४२,३३०/- |
| ३. | वॉचमन | ०३ | प्रति कर्मचारी रु.२६,१५४/- | ९,४१,५४४/- |
| ४. | कामगार | १० | प्रति कर्मचारी रु.१४,,८७१/- | १७,८४,५२०/- |
| ५. | वाहन चालक | ०१ | प्रती वाहन चालक रु.२३,२२४/- | २,७८,७००/- |
| एकूण | - | - | - | ४१,६८,३२६/- |

वरील प्रमाणे चाऱ्याचा खर्च प्रतिदिन १० जनावरे धरुन त्यास प्रतिदिन एका जनावरास ३ पेंडी प्रमाणे एकूण ३० पेंडी त्यास लागेल. त्याचा पेंडीचा खर्च रु.५०/- प्रती पेंडीप्रमाणे रु.१५००/- प्रतीदिन ३६५ दिवसांकरीता रु.५,४७,५००/- खर्च येईल. तसेच वाहनाच इंधन खर्च प्रती दिवस ७ लिटर डिझेल करीता रु.४९०/- ३६५ दिवसांकरीता रु.१,७८,८५०/- खर्च अपेक्षीत आहे. अश्या प्रमाणे कर्मचारी, चारा व इंधन यांचा एकूण वार्षिक खर्च रु.४८,९४,६७६/- इतका खर्च येईल. व यापुर्वी दिलेल्या ठरावाचे अनुषंगाने दंड, खावटी व सोडबांध याप्रमाणे जनावरांचे मालकांकडून वसूल करता येईल. मात्र म.न.पा.ने स्वत: कोंडवाडा सुरु केल्यास जनावरांना म.न.पा.कडून चारा पाणी इत्यादीची सुविधा उपलब्ध करावी लागेल.

तसेच खाजगी गो- शाळा संस्थेस ५ वर्षाकरीता देखभालीसाठी देणे झाल्यास त्यामध्ये म.न.पा.चा हिताचा विचार करुन मिळणाऱ्या उत्पन्नाच्या बाबतीचा प्रस्ताव सादर करणे आवश्यक असून त्यातील संस्थेस दंड, खावटी, सोडबांध या कामी वसूल केलेल्या रक्कमे मधून प्रतिवर्षी अपेक्षीत उत्पन्न धरुन संस्थेकडून रॉयल्टीची मागणी करणे आवश्यक आहे. जेणे करुन कर्मचाऱ्यावर होणाऱ्या वार्षिक खर्चाची तुटभरुन निघेल. त्यामुळे खाजगी संस्थेस कोंडवाडा देणे झाल्यास म.न.पा.चा आर्थिक परिस्थितीचा विचार करुन रॉयल्टी स्वरुपात रक्कम प्राप्त होईल अश्या प्रकारची निविदा प्रक्रिया करणे योग्य होईल.

प्रस्तावित केले प्रमाणे जळगांव शहर महानगरपालिकेच्या मालकीचा भटक्या जनावरांचा कोंडवाडा ३ वर्षे कालावधीसाठी देखभालीकरीता देणे करीता संस्थेची ई-निविदाव्दारे निवड करणेस मान्यता देण्यात येत आहे.

प्रशासनाने मेहरुण, खेडी, पिंप्राळा तसेच शहरातील गावठाण भागातील शेतकऱ्यांचे मालकीची असलेली पाळीव जनावरे असल्या बाबतची खात्री करुन घ्यावी त्यानंतरच सदरची जनावरे मोकाट आहेत याची शहानिशा झालेनंतरच जनावरे कोंडवाडयात घेवून जाण्याची कार्यवाही करण्या संदर्भात निर्देश मक्तेदारास दयावेत.

सदर प्रकरणी प्रशासनाने शासन आदेश/निर्देशाप्रमाणे नियमानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**
**अनुमोदक:- ढेकळे सदाशिव गणपत**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ७)** जळगांव शहर महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचाऱ्यांना तसेच निवृत्तीवेतन व कुटूंब वेतनधारकांना सातवा वेतन आयोग लागू करणे तसेच सुधारीत दराने व महागाई भत्ता ओलांडेल त्यानुसार घरभाडे भत्ता लागू करणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. भगत बालाणी :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे. कर्मचारी तुपाशी बाकी सर्व उपाशी

**श्री.ईब्राहीम पटेल :-** महापौर साहेब , आयुक्त साहेब सगळयांना ७ वा वेतन आयोग लागू करावा त्यांच्या तो अधिकार पण आहे आपण त्यांना तो लागु करायला पण पाहीजे .

**मा.उपमहापौर :-** काय भाऊ तुम्ही प्रत्येक विषयांवर चर्चा करताय .

**श्री.ईब्राहीम पटेल :-** दोनच मिनिटे मी कर्मचाऱ्यांच्यांच बाबतीत मांडतोय ना दोन मिनिटे बोलु द्या.

**मा.उपमहापौर :-** मांडायची गरजच नाहीये ना .

**श्री.ईब्राहीम पटेल :-** हा विषय नाहीये दुसरा आहे.

**मा.उपमहापौर :-** काय आहे दुसरा .

**श्री.ईब्राहीम पटेल :-** अश्विनभाऊ दुसरा विषय आहे मला आयुक्त साहेब आपल्या महापालिकेचे निवृत्त शिक्षक आहेत जे पेन्शनर आहेत . आपण त्यांना फक्त ५० टक्के पेन्शन देतोय आणि दिलेली आहे हे खर आहे का .

**मा.आयुक्त :-** आपले सेवानिवृत्त शिक्षक आणि कार्यरत शिक्षक याच्यामध्ये गेल्या २०१६ पासुन त्यांचे काही थकीत पेंमेंट आहेत ५० टक्के आपण महानगरपालिकेचे देतो .

**श्री.ईब्राहीम पटेल :-** नाही नाही असे का .

**मा.आयुक्त :-** त्याच्यात सुध्दा आता मी आल्यानंतर मागचा एक महिना आणि चालुचा एक महिना असे देण्याचा एक प्रयत्न केलेला आहे .

**श्री.ईब्राहीम पटेल :-** शासनाकडुन त्यांना काय दिले गेले ते नाही आपल्याकडुन त्यांना काय दिले आहे.

**मा.आयुक्त :-** नाही त्यांचे थकीत वेतन मार्च २०१६ पासुनचे वेतन राहीलेले आहे.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** हे खर आहे का.

**मा.आयुक्त :-** म्हणजे हे खर आहे का हे विचारायचे का हे प्रत्येक वेळी आपली चर्चा होतेय गेल्या वर्षापासुन हेच चालु आहे.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** आपले काही शिक्षक सेवानिवृत्त झालेले आहेत बरोबर आहे जे त्यांना द्यायचे होते ते आपण दिलं तेही आपण त्यांना फक्त ५० टक्के देतोय . तर त्यांना त्यांच्या हक्काची रक्कम आपण त्यांना जास्त देत नाहीये हा अन्याय त्यांच्यावर आहे काल हा यांच्यावर पण येणार आहे.

**मा.आयुक्त :-** आपण त्यांना कुठेही डावलेलं नाही . ज्यानुसार पैसे उपलब्ध होताय त्यानुसार आपण त्यांना करून देतोय . आपल्याकडे बरेचश्या कर्मचाऱ्यांचे जे कार्यरत आहेत आणि जे सेवानिवृत्त आहेत त्यांच सुध्दा आपण योग्य नियोजन करतोय.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** साहेब ते नाही.

**मा.आयुक्त :-** नाही नाही विषय समजुन घ्या.आपले जे कर्मचारी आहेत त्यांच्या सुध्दा ज्या सोसायटया वगैरे ज्या कपात आहेत.त्यासुध्दा आपण नंतर देतोय त्या महिन्यात देत नाहीत.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** ते नंतर द्या पण चालुचे जे वेतन आहे ते पुर्ण करा . थकबाकी वाल्याचे नंतर द्या . हा जो खर्च आहे.

**मा.आयुक्त :-** आज जे आहे याची पुर्ण रक्कम जर धरली तर ती १६ कोटी ८१ लाख रू आहे .

**श्री.ईब्राहीम पटेल :-** अहो साहेब हे १६ कोटी आपण आजच जे दोनच प्रस्ताव आलेले आहेत हे त्यालाच देतोय .

**मा.आयुक्त :-** कुणाचे दोन प्रस्ताव.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** तेच जे आपले आलेले आहेत भुसंपादनाचे आपण आपल्या कर्मचाऱ्यांचे देत नाही आणि भुसंपादन करतोय .

**मा.आयुक्त :-** भुसंपादनाचे विषय आणि कर्मचाऱ्यांची तुलना केली तर हे विषय वेगवेगळे आहेत.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** मी सांगतोय भुसंपादनावरती एक समिती गठीत करा भयानक घोळ चालु आहे. त्याची चौकशी लावा लोकांचे काही हरामाचे पैसे नाही आहेत.

**श्री. सुनिल खडके :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २१८ पारित करण्यात आला.**

जळगांव शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील स्थायी अधिकारी व कर्मचाऱ्यांना तसेच निवृत्ती वेतन व कुटूंब वेतन धारकांना सातव्या वेतन आयोगाच्या शिफारसी लागू करणेस मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावाचे वाचन केले.

प्रशासनाच्या उक्त प्रस्तावाचा विचार करता असा ठराव करण्यात येत आहे की, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ वित्त विभाग मंत्रालय,मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० जानेवारी २०१९ रोजीची अधिसूचना व शासन निर्णय क्र.एमसीओ-२०१९/प्र.क्र.१०२/नवि-१४ दिनांक ०२ ऑगस्ट,२०१९ अन्वये राज्य शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिनांक ०१/०१/२०१६ पासुन सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे उपरोक्त शासन निर्णयान्वये राज्यातील

महानगरपालिकांमधील अधिकारी / कर्मचारी यांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतनश्रेणी लागू करण्याबात शासनाने खालील बाबींची पुर्तता करणे आवश्यक असल्याचे कळविलेले आहे. त्यानुसार;

१. प्रभाग अधिकारी,प्रभाग समिती क्रमांक १ ते ४ अंतर्गत जळगांव शहरातील जुन्या मालमत्ता कर असलेल्या एकूण ९०,००० मिळकती जळगांव शहरात आहे व तसेच, नविन सर्व्हेक्षणानुसार २५ ते ३० हजार नविन मिळकतीवर कर आकारणीचे काम चालू असून जुन्या मिळकतीमधील झालेल्या बदलानुसार **अंदाजे २५ कोटी** वाढ तसेच मालमत्ता कराचे संपुर्ण काम संगणीकृत पुर्ण झाल्यानंतर शासन निर्णय क्र.तेविआ/ २०१०/प्र.क्र.१३१/ २०१०/ नवि-४ दिनांक २५/१०/२०१० नुसार ई-गव्हर्नन्स अंतर्गत **२२ कोटी** रक्कम वाढ आणि सन २०१९-२० या आर्थिक वर्षापासून घनकचरा व्यवस्था (रहिवास व अरहिवास) हा नविन कर आकारण्यात येणार असून त्यामुळे रक्कम **०३ कोटी** पर्यंत वाढ अपेक्षीत आहे. जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहाकारी बँकेव्दारा घेतलेल्या कर्जाची पूर्ण परतफेड, हुडको कर्जाचा शासन सहकार्याने एकरकमी भरणा व मनपा मालकीच्या गाळयांची सन २०१२ पासून नुकसान भरपाईची वसूली माहे सप्टेंबर २०१९ मध्ये सुरु झाल्याने जळगांव मनपाचे आर्थिक स्त्रोत बळकट होत आहेत.

२. महानगरपालिकेअंतर्गत विकास कामे,केंद्र व राज्य शासनाच्या योजनेतील महापालिकेचा हिस्सा,विकास कामांसाठी घेतलेले कर्ज आणि व्याज यांच्या परतफेडीसाठी पुरेसा निधी शिल्लक राहील याची खात्री करण्यात आलेली आहे.

३. महसूली उत्पन्नात झालेली वाढ व होणाऱ्या वाढीसाठी विविध उपाय योजना तसेच खर्चात काटकसर व बचतीच्या केलेल्या उपाययोजना पाहता आस्थापना खर्च विहीत मर्यादेत ठेवता येईल. त्यानुसार महापालिकेने उत्पन्नात वाढ करुन त्याचा आस्थापना खर्च पुढील तीन वर्षात विहीत मर्यादेत राहील याबाबत उपाययोजना करण्यात आली आहे.

४.सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतन आयोगानुसार सुधारीत वेतनश्रेणी लागू केल्यामुळे येणारे अतिरीक्त वित्तीय दायित्व शासनाकडून देण्यात येणारे जी.एस.टी.अनुदान व महापालिकेच्या स्वउत्पन्नातून भागविण्याचे असल्याने,सातव्या वेतन आयोगाच्या तरतूदी लागू करतांना महापालिकेची आर्थिक स्थिती विचारात घेवून निर्णय घेण्यात येत आहे.

त्यामुळे सातव्या वेतन आयोगाच्या शिफारसीच्या अनुषंगाने (**अ**) जळगांव शहर महानगरपालिकेतील पात्र अधिकारी / कर्मचारी / शिक्षक तसेच निवृत्ती वेतन व कुटूंब वेतन धारक यांना दि.०१/०१/२०१६ पासून सातवा वेतन आयोग लागू करणेस **(ब)** जळगांव शहर महानगरपालिकेतील पात्र अधिकारी / कर्मचारी / शिक्षक तसेच निवृत्ती वेतन व कुटूंब वेतन धारक यांची वेतन निश्चिती करुन,प्रत्यक्षात दि.०१ जानेवारी २०१९ पासून सातव्या वेतन आयोगनुसार वेतन व निवृत्ती वेतन अदा करणेस, (**क**) माहे जानेवारी २०१९ ते प्रत्यक्ष वेतनात व निवृत्ती वेतनात लागू करणेचे महिन्याच्या अगोदरच्या वेतनाचा फरक वेतनात रोखीने अदा करणेस, **व** मान्यतेनंतरचे वेतनपत्रक व निवृत्ती वेतनपत्रक तयार करणेस, (**ड**) दि.०१ जानेवारी २०१६ ते दि.३१ डिसेंबर २०१८ या कालावधीतील वेतनाच्या अनुज्ञेय थकबाकीची रक्कम प्रदान करण्याची पद्धती महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ वित्त विभाग मंत्रालय,मुंबई ४०० ०३२,दिनांक ३० जानेवारी २०१९ रोजीची अधिसूचना मधील (१४) (१) (अ),(ब) मध्ये नमुद केल्यानुसार अदा करणेस, (**इ**) राज्य शासकीय कर्मचारी व इतरांना सुधारीत दराने घरभाडे भत्ता मंजूर करण्याबाबत शासन निर्णय क्रमांक : घभाभ-२०१९/प्र.क्र.२/सेवा-५ दिनांक ०५ फेब्रुवारी,२०१९ अन्वये घरभाडे भत्ता सुधारीत दराने व महागाई भत्त्याची नमुद मर्यादा ओलांडेल त्यानुसार अदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तरी सदरचा प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी पाठविण्यात यावा.

तसेच सातवा वेतन आयोगासंबंधी वेळोवेळी निर्गमित होणारे शासन निर्णयांवर निर्णय घेण्याचे अधिकार आयुक्तांना प्रदान करण्यात येत आहे.

सदर प्रकरणी प्रशासनाने शासन आदेश/निर्देशाप्रमाणे नियमानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- बालाणी भगतराम रावलमल**
**अनुमोदक :- खडके सुनिल वामनराव**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ८)** मा.महासभा ठराव क्र.१५७ दि०६/०६/२०१९ च्या अनुषंगाने श्री.गोपी राजू हंसकर (बडतर्फ सफाई कामगार) यांना जळगांव शहर महानगरपालिकेच्या सेवेतून बडतर्फ करण्यात येवून त्यांची सेवा समाप्त करण्यात आल्याच्या प्रकरणाबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**ॲड . शुचिता हाडा :-** मा.महापौर ताई आणि मा.आयुक्त साहेब प्रशासनाकडुन हा जो बडतर्फीचा प्रस्ताव आलेला आहे . त्या संदर्भात मला असे सांगायचे आहे .श्री.राजु गोपी हंसकर यांचा जो बडतर्फीचा प्रस्ताव आलेला आहे . त्यात जे कारण दिलेलं होत त्यांच्या बडतर्फीसाठी ते कारण हे होतं की तत्कालीन स्थायी समिती सभापती ज्या होत्या . त्यांनी या कर्मचाऱ्याची जिथे नियुक्ती होती त्या ठिकाणी तो स्वत: काम करत नव्हता . त्याच्याऐवली त्याने त्या ठिकाणी खाजगी माणुस लावुन व त्याच्या माध्यमातुन ते काम करून घेतलं जात आहे अश्या स्वरूपाचे आलेले होते . तर त्याबद्दल त्या कर्मचाऱ्याने माफी मागीतलेली आहे आणि त्यानंतर त्याच तत्कालीन सभापतींचे पत्र सुध्दा रेकॉर्डला आहे की त्या मध्ये या कर्मचाऱ्याबद्दल आता मला काहीही तक्रार नाही आणि याचे काम आता समाधानकारक आहे असं त्या सभापंतीचं पत्र सुध्दा रेकॉर्डवर आहे आणि त्या कमर्चाऱ्याने माफी देखील मागीतलेली आहे. कंम्पलेंट आहे ती कंम्पलेंट तिथे सिध्द झाली होती की तो स्वत: काम करत नव्हता. व त्यानंतर काही ईतर रिपोर्ट सुध्दा आहेत की तो तिथे काम करत नव्हता पण तो इतर ठिकाणी काम करत होता. ते थोडं वेरीयेशन आहे ईथे थोडासा स्कोप आहे हे म्हणायला की हे मॅच होत नाही पण ज्या सभापतींची कम्पलेंट होती ज्या सभापतींची तक्रार होती त्यांनीच नंतर त्याचे काम समाधानकारक काम असल्याचा आणि आता काही तक्रार नाही असे पत्रपण रेकॉर्डवर आहे . आज तो कर्मचारी माफीनामा सुध्दा लिहुन द्यायला तयार आहे की पुन्हा अशी कसुर होणार नाही .असं तो लिहुन देण्यास तयार आहे . तर अश्या परिस्थितीमध्ये त्याला कामावर पुन्हा रूजू करून घेण्यात यावं असा आमचा प्रस्ताव आहे . प्रशासनाचा हा बडतर्फीचा प्रस्ताव आम्ही अमान्य करत आहोत आणि त्याला पुन्हा सेवेत सामावुन घेतलं जाव असा प्रस्ताव आहे.

**श्री. कैलास सोनवणे :-** महापौर साहेब, सर्व कर्मचाऱ्याने मुदतीच्या आत कारण दिलेल आहे. कारण टेक्नीकल बाब ही पाहण्यासारखी नाही. पुर्वीही त्यांनी स्थायी समिती सभापतींकडे अर्ज दिलेला आहे. त्यांची शिक्षा कमी करा साहेब. या मुद्दयासाठी बडतर्फी हा विषय नाही होऊ शकत.

**ॲड . शुचिता हाडा :-** बडतर्फीही टोकाची शिक्षा आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** या मध्ये नाही बसत बडतर्फी हे आमचा समज आहे. कलम ५६(२) मध्ये वेगवेगळया शिक्षा आहे. त्याची बदली करणे, त्यामध्ये डिमोशन करणे , इन्क्रीमेंट बंद करणे असे शिक्षा आहे. बडतर्फी एकदम शेवटची शिक्षा आहे त्यामध्ये एकदम शेवटची शिक्षा आहे.

**श्री.इब्राहिम पटेल :-** माझी बदलीवरती अशी सुचना आहे की महापालिकेने जे प्रत्येक टेबलावर कर्मचारी नव्हते. अधिकारी नव्हते.

**श्री.कैलास सोनवणे :-** आहो तुम्ही थांबा जरा दोन मिनिटं गप बसा, मजाक मध्ये नका घ्या विषय.

**श्री. इब्राहिम पटेल :-** नाही अप्पा, चांगला विषय आहे. मी मजाक करीत नाहीये ना आप्पा.

**श्री.कैलास सोनवणे :-** विरोधी पक्षात बसलेले आहेत तुम्ही कसे बोलायला पाहीजे काय बोलताय तुम्ही.

**श्री. इब्राहिम पटेल :-** काय बोललो मी आता .

**श्री.कैलास सोनवणे :-** आता येथे जुनियर पण बसलेले आहे ते बोलले तर आम्ही समजु शकतो की ठिक आहे.

**श्री. इब्राहिम पटेल :-** आप्पा बडतर्फीचा विषय निघाला म्हणुन सांगतो की

**श्री.कैलास सोनवणे :-** काय विरोध करताय काही समजत नाहीये.

**श्री. भगत बालाणी :-** अप्पांचे म्हणणे हे आहे की , बडतर्फीचा विषय आहे तो करून घ्या नंतर पुढचा विषय घ्या.

**श्री. इब्राहिम पटेल :-** पुढचे विषय मांडा ना बदल्यावरती बोलत होता ती

**श्री.कैलास सोनवणे :-** अहो पण हा विषय बडतर्फ चा आहे ना.

**मा.आयुक्त :-** तत्कालीन आयुक्तांनी हा जो निर्णय घेतलेला आहे. तो त्या परिस्थितीमध्ये त्याच्या प्रमाणे तो आयुक्तांच्या प्रमाणे तो निर्णय त्या दृष्टीने योग्य आहे. आता आपण त्यात पुनरविचार करु. आणि पुन्हा या कालावधीचा , म्हणजे सन २०१८ ला ती बडतर्फी झालेली आहे. आणि आज पुन्हा दोन वर्षाच्या ह्याच्यात परत Financial Bother चा विषय येईल. त्याच्यामुळं आता जी कागदपत्रे मी पाहिले त्याप्रमाणे ती बडतर्फी योग्य असल्याचे दिसुन येते.

**श्री. कैलास सोनवणे :-** साहेब विषय काय आहे त्या वेळेस श्री.किशोरराजे निंबाळकर साहेब जळगांव शहराचे जिल्हाधिकारी होते. आणि त्या पिरेड मध्ये एक वेळा त्यांनी बडतर्फी केल्यानंतर ते निर्णय मागे घेऊ शकत नव्हते. आणि त्यांनी सरसकट भरपुर कर्मचाऱ्यांना बडतर्फ केले साहेब. त्यातले आपण काहींना परत घेतले. काहींच्या शिक्षा कमी केल्या संदर्भात आपले म्हणणं काय आहे. तुम्ही ऐकुन घ्या. समजुन घ्या त्यांनी स्थायी समिती समोर अर्ज केलेला आहे ९ जानेवारीला, दि.३०/१२ ला तो बडतर्फ झाला आहे. आणि ८ जानेवारी ला तुमच्या कडे आणि ९ जानेवारीला स्थायी कडे दिलेला आहे. आणि स्थायीच्या प्रोसेसला त्याला वेळ लागला, काही वेळ निबाळकर साहेब होते तेव्हा लागला. मग दोन वर्ष झाले, तो बडतर्फ झाला तर त्याच्या मुलांच्या शिक्षणाच्या खर्चावर फरक पडणारच आहे. तो काही पैसेवाला नाही आहे तो, साफ सफाई करणारा एक कर्मचारी आहे. परंतु कुठेही कोणत्याही कर्मचाऱ्यावर कोणीही असो तो त्याच्या सोबत अन्याय

होऊ नये. यात चार विषय बडतर्फीचे आहे. प्रत्येकात वेगवेगळे मुद्दे आहे साहेब. या विषयावर मी का बोलत आहे. कारण डायरेक्ट बडतर्फी योग्य नाही. त्याची थोडी चुक आहे. तिच्या चुकी प्रमाणे शिक्षा द्या तुम्ही. परंतु डायरेक्ट बडतर्फी हे मनाला पटण्यासारखा वाटत नाही. तरी आमची विनंती राहील की, त्याची शिक्षा कमी करावी. हे सर्वांसाठी नाही फक्त विषय क्र.८ साठी आहे.

**मा.आयुक्त :-** मा.आयुक्तांनी तो निर्णय घतलेला आहे आता सभागृहाने निर्णय घ्यायचा आहे. मी फक्त वस्तुस्थिती सांगितली.

**सौ. ॲड.शुचिता हाडा :-** हे सभागृह त्यांना परत सेवेत सामावुन घेण्याबाबतचा प्रस्ताव देत आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.आयुक्त :-** मधल्या कालावधीच पेमेंट, त्यांचा पगार द्यायचा, आयुक्तांचा रोल संपलेला आहे.आता काय शिक्षा द्यायची आहे सभागृहाने निर्णय घ्यावा. मागच्या पगाराचे काय ?

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही मागचा पगार देऊ नका. त्याची शिक्षा कमी करा. त्याचे इंक्रिमेंट बंद करा. ते डिसिझन तुम्ही घ्या.

**मा.आयुक्त :-** आता पर्यंत तो सेवेतच नाही. म्हणुन इंक्रिमेंट बंद करण्याचा प्रश्नच येत नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** तुम्हाला जे करता येईल ते करा साहेब.

**मा.आयुक्त :-** आयुक्त म्हणुन माझा रोल संपलेला आहे. सभागृहाने जो काही निर्णय घेतलेला आहे तो दयावा.

**सौ. ॲड.शुचिता हाडा:-** बडतर्फीच्या कालावधी मधील पगार देऊ नका म्हणजे ती शिक्षा होईल.

**सौ. ॲड.शुचिता हाडा:-** नाही, बडतर्फीच्या कालावधी मधील पगार देऊ नका.

**मा.आयुक्त :-** काही शिक्षा जर नाही द्यायची असेल तर निर्दोष घोषित करा.

**सौ. ॲड.शुचिता हाडा:-** बडतर्फीचा पगार नाही मिळाला म्हणजे त्याला एका प्रकारची शिक्षाच झाली.

**श्री.कैलास सोनवणे :-** त्याला पगार देऊ नका ना तुम्ही.

**मा.आयुक्त :-** योग्य असेल तर आम्ही अंमलबजावणी करु.

**सौ. ॲड.शुचिता हाडा :-** प्रशासनाचा प्रस्ताव अमान्य करण्यात यावा.

**श्री . दिलीप पोकळे :-** प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २१९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, प्रशासनाचा प्रस्ताव अमान्य करणेत येत असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५६ (२) (ह) नुसार श्री.गोपी राजू हंसकर यांना जळगांव शहर महानगरपालिकेच्या सेवेतून बडतर्फ करण्यात आलेले आहे मात्र श्री.हंसकर यांना कामावर गैरहजर असल्याचे किरकोळ कारणास्तव बडतर्फ करण्यात आले आहे. परंतू नंतर तत्कालीन स्थायी समिती सभापती यांनी श्री.हंसकर यांचे काम समाधानकारक असलेबाबत कळविलेले आहे. गैरहजर राहाण्याची सौम्य चूक त्यांनी केलेली आहे व ती त्यांनी मान्य केलेली आहे. त्यांचेवर संपूर्ण कुटूंबाची उदरनिर्वाहची व मुलांचे शिक्षणाची जबाबदारी असल्याने श्री.गोपी राजू हंसकर यांना न्याय तत्वानूसार व प्रकरणाचा गुणवत्तेच्या आधारे विचार करून पुन्हा कामावर घेणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. मात्र त्यांना बडतर्फ कालावधीतील वेतन अदा करण्यात येवु नये.

सदर प्रकरणी प्रशासनाने शासन आदेश/निर्देशाप्रमाणे नियमानुसार कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- ॲड . हाडा शुचिता अतुलसिंह**

**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ९)** मा.महासभा ठराव क्र.१६५ दि०६/०६/२०१९ च्या अनुषंगाने जळगांव शहर महानगरपालिकेतील स्वेच्छा सेवानिवृत्त केमिस्ट श्री.विजय सुकदेवराव यादव यांना केमीस्ट पदावर पुनश्च:रुजू करुन घेणेच्या प्रकरणासदंर्भात प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.कैलास सोनवणे :-** नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.

**श्री.सुनिल महाजन :-** आयुक्त साहेब यात जे त्रुट्या आहे. नियमानुसार काही जी.आर. पारित झालेले आहे. त्या अनुषंगाने अभ्यास करा आणि पुढच्या मिटींगला नविन प्रस्ताव पुन्हा सादर करा.

**ॲड . शुचिता हाडा :-** तो पर्यंत हा विषय तहकुब ठेवण्यात यावा.

**श्री.सुनिल महाजन :-** तहकुब नाही. नविन प्रस्ताव पुढच्या महासभेत घेण्यात यावा.

**ॲड . शुचिता हाडा :-** काही त्रुटी असेल तर ते दुर करुन पाहुन पुढच्या महासभेत नविन प्रस्ताव पुन्हा सादर करण्यात यावा.

**श्री.दिलीप पोकळे :-** माझे अनुमोदन आहे.

**सूचक :- ॲड . हाडा शुचिता अतुलसिंह**

**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २२० पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, श्री.विजय सुकदेवराव यादव यांना केमीस्ट पदावर पुनश्च:रुजू करुन घेणे बाबतच्या प्रस्तावात तृटया असल्यामुळे त्यामधील तृटया दुरुस्त करुन प्रशासनाने प्रस्ताव तपासून नविन सुधारित प्रस्ताव तयार करुन पूढील महासभेत सादर करावा.

सदर प्रकरणी प्रशासनाने शासन आदेश/निर्देशाप्रमाणे नियमानुसार कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६** **प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- ॲड . हाडा शुचिता अतुलसिंह**

**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १०)** मा.महासभा ठराव क्र.१५९ दि०६/०६/२०१९ च्या अनुषंगाने श्री.अनिल आत्मचरण ढंढोरे (बडतर्फ लिपीक) यांना जळगांव शहर महानगरपालिकेच्या सेवेतून बडतर्फ करण्यात येवून त्यांची सेवा समाप्त करण्यात आल्याच्या प्रकरणाबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**ॲड. शुचिता हाडा :-** सदर बडतर्फीचा प्रस्ताव सुध्दा आम्हाला अमान्य आहे. तरी त्यांना जे काही शिक्षा देऊन अटी शर्ती ंनुसार त्यांची बडतर्फी रद्द करुन पुन्हा सेवेत सामावुन घेण्यात यावे.

**मा.आयुक्त :-** माझी सभागृहाला विनंती आहे, ज्या वेळेला कर्मचाऱ्यांच्या बाबतीत असे जे काही ठराव येतात. पुर्ण त्या प्रकरणाच्या गुणवत्तेवर विचार करण्यात यावा. अन्यथा प्रशासनामध्ये एक वेगळा मॅसेज जातो. आणि दैनंदिन कामकाजावर अनिष्ट परिणाम होतो. आताची जी केस आहे ती विभागीय आयुक्तांनी आता उपायुक्त सांगतील. त्यांनी ती ऑलरेडी निकाली काढली आहे.

**मा.उपायुक्त :-** हे जे कर्मचारी आहे यांच्या बाबतीत विभागीय आयुक्त यांच्या अंतिम निर्णयाअंती समितीने यांना कायम स्वरुपी नोकरीसाठी अपात्र ठरविलेल आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

**श्री.इब्राहिम पटेल :-** कोणताही विषय असो. सभागृहाच्या दबावा मध्ये निर्णय घेऊ नका. नियमात बसत असेल तर करा.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** सत्ताधारी व विरोधी पक्षातील सदस्यांनी शांतता धरावी अशाप्रकारची सभा चालते का छोटया छोटया गोष्टीवरुन भांडत करतात या ठिकाणी पत्रकार आहेत वृत्तपत्रावाले आहेत.

**श्री.कैलास सोनवणे :-** बरोबर आहे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** ते फोटो घ्यायला येतात म्हणुन हे असं होतय.

**श्री.कैलास सोनवणे :-** दोन्ही गटांचे ऐकुन घ्या आणि मग निर्णय घ्या .

**ॲड. शुचिता हाडा :-** विषय क्र.१० आणि ११ बद्दल प्रशासनाने नियम आणि तरतुदी तपासुन नियमानुसार निर्णय घ्यावा.

**श्री.दिलीप पोकळे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २२१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, श्री.अनिल आत्मचरण ढंढोरे (बडतर्फ लिपीक) यांचा प्रस्ताव तपासून प्रशासनाने नैसर्गिक न्याय तत्वानुसार नियमानुसार कार्यवाही करावी.

सदर प्रकरणी प्रशासनाने शासन आदेश/निर्देशाप्रमाणे नियमानुसार कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- ॲड . हाडा शुचिता अतुलसिंह**

**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ११)** मा.महासभा ठराव क्र.१५८ दि०६/०६/२०१९ च्या अनुषंगाने श्री.गंगाधर श्रावण गायकवाड (बडतर्फ फिटर) यांना जळगांव शहर महानगरपालिकेच्या सेवेतून बडतर्फ करण्यात येवून त्यांची सेवा समाप्त करण्यात आल्याच्या प्रकरणाबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. २२२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, श्री.गंगाधर श्रावण गायकवाड (बडतर्फ फिटर) यांचा प्रस्ताव तपासून प्रशासनाने नैसर्गिक न्याय तत्वानुसार नियमानुसार कार्यवाही करावी.

सदर प्रकरणी प्रशासनाने शासन आदेश/निर्देशाप्रमाणे नियमानुसार कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :-** ॲड . हाडा शुचिता अतुलसिंह

**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

**श्रीमती सईदा बी शेख :-** हमारे वार्ड नं.१८ मे साफसफाई वाले आते नही, गटार निकालनेवाले आते नही. झाडु मारने

**सौ.गायत्री शिंदे :-** आयुक्त साहेब माझे हे म्हणणे आहे की, शिवाजी नगरच्या पुलाच्या कामावर तुमचे नियंत्रण आहे की नाही. कारण ८-९ महिने झाले काही प्रगती नाही.

**मा.आयुक्त :-** आता रेल्वेचा जो पोरशन आहे तेथे रेल्वे काम करीत आहे. आणि बाकी जे आहे तेथे सार्वजनिक बांधकाम विभाग काम करत आहे.

**सौ.गायत्री शिंदे :-** किती दिवस झाले काम सुरु नाही.

**मा.आयुक्त :-** आता रेल्वेचा जो पोरशन आहे तेथे रेल्वे काम करीत आहे. आणि बाकी जे आहे तेथे सार्वजनिक बांधकाम विभाग करीत आहे. ते जळगांव महानगरपालिकेचे काम नाही.

**श्री.दिलीप पोकळे :-** आता रेल्वे काम करीत आहे. आणि सार्वजनिक बांधकाम विभाग काम करीत आहे. तर सार्वजनिक बांधकाम विभाग महानगरपालिकेचे आहे की, शासनाचे आहे.

**मा.आयुक्त :-** शासनाचे आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन.

**सौ.गायत्री शिंदे :-** साहेब तुम्ही म्हणत आहे आपले काम नाही. तर त्याची निधी मिळाली नाही आपल्याला.

**मा.आयुक्त :-** त्याच्या निधीचा प्रश्न होता. महानगरपालिकाला निधी द्या असे मंत्रालयाने सांगितलेलं होतं. महानगरपालिकेची परिस्थिती आपल्याला माहिती होती. शासनाने निधी उपलब्ध करुन देण्याचा इशु सुध्दा सेटल झालेला आहे.

**श्री. रियाज बागवान :-** सर वॉटर ग्रेस साफसफाई ला किती वेळ लागणार हे सांगा .

**डॉ.विकास पाटील :-** आपण जे दिले होते १ कोटी ४६ लाख त्यावेळी प्रभाग समिती प्रमाणे दंड केलेला आहे आपण,

**श्री.रियाज बागवान :-** नक्की केल आहे का ?

**डॉ.विकास पाटील :-** हो केलेलं आहे.

**श्री.रियाज बागवान :-** जे अटीशर्ती आपण त्याला दिल्या आहेत. तो त्याप्रमाणे काम करत आहे का ? आपण त्यांना बायोमेट्रीक चे काम दिले होते ते काम करत आहेत का कुणी.

**डॉ.विकास पाटील :-** ३ महिन्यानंतर त्याला करावेच लागेल.

**श्री. रियाज बागवान :-** नाही ३ महिन्याच्या आंत करायची वाट नका बघु त्याला वॉर्निंग द्या.आपण त्याच्याशी करारनामा केलेला आहे तशी आपण कंडीशन टाकलायला पाहीजे होती आणि हे सर्व गोष्टी झाल्यानंतर सुध्दा तो काम करत नाही साहेब .

**डॉ.विकास पाटील :-** हे काम पुर्ण करणे गरजेचे होते आणि ते करून देणे समोरच्याचे .

**श्री. रियाज बागवान:-** हया सर्व गोष्टी झाल्यानंतर सुध्दा काम होत नाहीये.

**डॉ.विकास पाटील :-** मी पहिल्या दिवसापासुन बघतोय की जी जबाबदारी होती त्याची आणि त्याने काम केले नाही म्हणुन आपण त्याला दंड केलेला आहे त्यानंतर चौकशी करून त्याचा मेमो वाढवला आहे .

**श्री. रियाज बागवान:-** साहेब मला एक विचारायचे आहे की अधिकाऱ्यांना हे अधिकार आहेत का की बिल काढल्यानंतर त्याला दंड करू शकतात तशी काही तरतुद असेल तर आम्हाला सांगा .

**श्री.कैलास सोनवणे :-** हा विषय निघालेला आहे आरोग्य विभागासंबंधी बोलावे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आयुक्त साहेब आपले नगरसेवक दररोज महासभेमध्ये व स्थायी समिती मध्ये ओरडुन ओरडुन थकुन गेले. ते वॉटर ग्रेस वाल्यांना का बोलवत नाही कोणी आहे का येथे आम्ही आमचे प्रॉब्लेम तुम्हाला सांगता पण ते त्यांच्यापर्यंत जात नाही हे काय आहे .आम्ही पत्र दिलेले आहे तुम्ही रेकॉर्ड बघा व त्यांना बोलवा ठेकेदाराला बोलवा. आम्ही त्यांना प्रश्न विचारू.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** हा ठेका संपुर्ण जळगांव शहराचा ठेका आहे का फक्त मर्यादीत भागासाठी आहे का . डॉ . साहेब हा जो ठेका आहे हा संपुर्ण शहरासाठी आहे का काही भागासाठी आहे.

**डॉ.विकास पाटील :-** संपुर्ण शहरासाठी घंटागाडी पुरविणे आणि साफसफाई करणेसाठीचा आहे.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** ठेकेदाराला स्वंतत्र वागणुक का , जळगांव शहरासाठी दिलेला आहे ना की फक्त काही ठाराविक भागांसाठी दिलेला आहे.

**डॉ.विकास पाटील :-** आज आपल्या कडे असे जे कामं आहे बरोबर आहे घराघरातुन कचरा गोळा करणे आपल्या घंटागाडया .

**श्री. ईब्राहीम पटेल :-** माझ्या प्रभागाचं काय आहे . आपण वॉटर ग्रेस ला संपुर्ण शहराचा ठेका दिलेला आहे तर काही वॉर्डात मर्यादित आहे.

**डॉ.विकास पाटील :-** सांगतो ना सांगतो ना , संपुर्ण शहराचा कचरा गोळा करून आणि तो कम्पोस्ट करायचा व कामासाठी ४०० माणसे पुरवायची .

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** ४०० माणसे पुरवायची म्हणजे त्यात झाडु कामगार , गटार कामगार हे किती पुरवायचे आहेत.

**डॉ.विकास पाटील :-** झाडु कामगार आणि गटार कामगार .

**श्री. ईब्राहीम पटेल :-** आता मला सांगा की हया वॉटर ग्रेस चे किती कामगार काम करताहेत हे सांगा .

**डॉ.विकास पाटील :-** झाडु कामगार आणि गटार कामगार हे काम करत आहेत .

**श्री. ईब्राहीम पटेल :-** ऐक पण कर्मचारी नाही येत आहे .

**डॉ.विकास पाटील :-** आधी जायचे कर्मचारी .

**श्री. ईब्राहीम पटेल :-** ऐक पण कर्मचारी येत नव्हता आतापर्यंत आणि त्याला आता माहिती आहे की महासभा येते आहे आणि आरडाओरडा होईल आणि काल त्यांनी आम्हाला ते लेटर दिलं की एव्हढे कर्मचारी तुमच्या प्रभागात काम करता आहे. हे मी मागच्या सभेतपण मांडले होते मी तुमच्या समोर की माझ्या वॉर्डात एकही गटार कामगार नव्हता आणि आताही प्रभागात पाणी गटारच्या वरून वाहतयं तुम्हाला खोटं वाटल असेल तर माझ्या बरोबर चला मी तुम्हाला दाखवतो . बरोबर आहे का साहेब मी मागेपण तुम्हाला सांगीतलं होत . आता या एरीया मध्ये कायम जे कर्मचारी आहेत ते आलेले आहेत . वॉटर ग्रेसचा एकही कर्मचारी माझ्या प्रभागामध्ये येत नाहीये .

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अहो डॉ.साहेब तुम्ही त्यांना उत्तर देवुन द्या ना नगरसेवकांना ते जे उचलताहेत **.**

**डॉ.विकास पाटील :-** कृष्णकांत ईकडे या

**श्री. ईब्राहीम पटेल :-** एकही कर्मचारी येत नाही वॉटर ग्रेस चा खान साहेबांना फोन लावला तो म्हणतो मी ईथेच आहे . येतोच आहे असे म्हणतो.

**श्री.एच.एम.खान :-** प्रभाग क्रं. १८ मध्ये १६ सप्टेंबर पासुन ते ७ ऑक्टोंबर पर्यंत वॉटर ग्रेसचे कर्मचारी या भागात काम करायला तयार नव्हते . मक्तेदाराचे तर येत नव्हते . त्यामुळे मग मा.उपायुक्त साहेबांच्या परवानगीने दि.०८/११/२०१९

पासुन त्याठिकाणी कर्मचारी दिलेले आहेत त्यामध्ये सफाई व गटार कामगार आहेत. आणि मा.सभापती साहेबांकडे बैठक झाली दोन दिवसांपुर्वी यासंबंधी आणि त्यावेळी .

**मा.उपमहापौर :-** मक्तेदाराचे कर्मचारी जात नाही त्याला काय उत्तर देणार .

**श्री.एच.एम.खान :-** कर्मचाऱ्यांना मारहाण झाली होती पोलीस स्टेशन पर्यंत गोष्ट गेलेली होती आणि त्याची आयडीया त्यांनाही आहे.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** काम सुरू व्हायला २ महिने झाले ना हो.

**श्री.एच.एम.खान :-** दोन महिने झालेत .

**श्री. ईब्राहीम पटेल :-** त्या ठिकाणी कर्मचारी तयार का नाहीत .

**श्री.एच.एम.खान :-** ऐकुन तर घ्या .

**श्री.रियाज बागवान :-** हे खरे आहे.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** ते कायमचे कर्मचारी होते त्यांना मारहाण झाली होती .

**श्री.एच.एम.खान :-** आता आपण त्याठिकाणी कायम कर्मचारी लावलेले आहेत आपण त्यांना जे दिलंय त्याप्रमाणे काम कर्मचारी करीत आहेत .

**श्री. ईब्राहीम पटेल :-** तुम्हाला सर्व परिस्थिती माहिती आहे आपण रोज येतात रोज जातात तिथे माझ्या वॉर्डात त्यांचे घर सुध्दा आहे . तुम्ही हे विसरून जा की तुम्ही येथील अधिकारी आहात . तुम्ही त्या वॉर्डातील नागरीक पण आहात वोटर पण आहात असे समजुन काम करा आपल्यावर येईल असे नका करू.

**श्री.रियाज बागवान :-** वॉटर ग्रेस मुळे कीती प्रॉब्लेम होतोय आणि वॉटर ग्रेस वाला म्हणतो की आम्हाला पेंमेंट मिळत नाहीये आणि ईकडे त्यांचे बिले काढले जात आहेत. आणि हा प्रॉब्लेम माझ्याच वॉर्डात नाही सगळयांच वॉर्डात आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** मी काय म्हणत आहे, ९५% नगरसेवक बोलत नाही. त्यांना काही प्रॉब्लेम नाही. फक्त एकाच वार्डाचे नगरसेवक बोलत आहे यांच्याच त्रुटया दुर करा.

**सौ.ज्योती चव्हाण :-** आम्ही बोलत नाही असे कोणीही सांगितले, प्रॉब्लेम सर्वांना आहे.

**सौ.ॲड.शुचिता हाडा:-** आम्ही तुम्हाला बोलु देत आहोत आणि शांतपणे ऐकत आहोत कारण हा विषय सर्वांचा आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** तुम्ही आरोप करत होते भाजप च्या नगरसेवकांवर तुमच्या नगरसेवकांनी आरोप केले. नितीनभाऊ बरडेंनी आरोप केलेले आहे. तर नांव सांगा आता.

**श्री.ईब्राहिम पटेल:-** तुम्ही स्वच्छतेच्या बाबतीत समाधानी आहे का ? नाही ना. तुम्हीच सांगितले की, स्वच्छतेचा विषय मांडा आणि आता असे म्हणत आहात.

**श्री.धिरज सोनवणे :-** विषय मांडाना मग, आरोप कशाला करत आहे. विषय मांडा.

**श्री.कैलास सोनवणे :-** ज्यांनी आरोप केलेले आहे ते सभागृह सोडुन पळुन गेले. मी विरोधीपक्ष नेते सुनिलभाऊ महाजन आणि बंटी जोशी यांना विनंती करेल. नितीन बरडेंना सभागृहात बोलवा आणि नांव विचारा त्यांना.

**श्री.अनंत जोशी :-** सन्मा.महापौर साहेबा, सभागृह आणि आयुक्त साहेब मी आपणास विनंती करतो की, नितीनभाऊ जे आहे त्यांना काही काम असल्यामुळे ते गेलेले आहे. ते काही पळुन गेलेले नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** आम्ही तर हेच म्हणु की, पळुन गेलेले आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** काम असेल तर सभागृह अध्यक्षांची परवानगी घेऊन नाही गेले म्हणजे याचा अर्थ हेच आहे की, ते पळुन गेलेले आहे. जाण्यास परवानगी घ्यायला पाहिजे.

**श्री.अनंत जोशी :-** नितीनभाऊंनी जे आरोप केलेले आहे ते काही लपुन छुपुन केलेले नाही. काल स्टॅण्डींगच्या मिटींग मध्ये केलेले आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** बंटी भाऊ पत्रकार परिषद मध्ये केलेले आहे ते.

**श्री.धिरज सोनवणे :-** नावासहित आरोप लावा. नाव असेल तर मान्य आहे आम्हाला आणि नाव नसतील तर सर्व भाजपाच्या नगरसेवकांशी सभागृहात माफी मागा.

**श्री.अनंत जोशी :-** नितीनभाऊं पळुन गेलेले नाही. या सभागृहाला मी सांगत आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** नितीनभाऊंनी आरोप केलं. आणि सामना करावा लागेल म्हणुन त्यांना चाहुळ लागली आमच दोन दिवसापुर्वी ठरलं होतं. त्यांना विचारणा करायची आहे. कोण कोण नगरसेवक पार्टनर आहे. आता विषय आला येथे आणि विषय येण्याच्या आगोदर ते पळुन गेले. आमच साफ म्हणणे आहे की पळुन गेले. आरोप नाही मी डायरेक्ट बोलत आहे. आरोग्यच्या विषयावर जशी तुमची नाराजी आहे तशी आमची ही नाराजी आहे.

**श्री.सुनिल खडके :-** सगळयांची नाराजी आहे. हे बोलनं चुकीचे आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** पुढच्या महासभेला नितीन भाऊ येतील ते देतील तुम्हाला उत्तर.

**सौ.ज्योती चव्हाण :-** आयुक्त साहेब आपण ज्या उद्देशाने हा ठेका दिलेला होता तो उद्देश पुर्ण झालेला नाही. ठेका देतांना आपण संपुर्ण जळगांव शहराचा ठेका दिला आणि संपुर्ण जळगांव शहराची साफसफाई त्याच्यात Include होती. आपण विभागणी करतांना काही वार्डामध्ये मक्तेदाराचे कर्मचारी दिले काही वार्डामध्ये महानगरपालिकेचे कर्मचारी दिले. पण पडणारा जो कचरा आहे तो उचलण्याची जबाबदारी मक्तेदाराची होती. ते तसे होत नाही. म्हणुन एकपण वार्ड स्वच्छ दिसत नाही. ज्या ठिकाणी मक्तेदाराचे मजुर काम करत आहे. त्या ठिकाणी ट्रॅक्टर बंद असतं. त्यामुळे कचरा उचलला जात नाही. त्याच्या शेजारच्या वार्डात महानगरपालिकेचे कर्मचारी काम करता. तेथे ट्रॅक्टरचा पुरवठा होत नाही. आणि आपण ठेका देतांना पुर्ण जळगांव शहराचा विचार करुन दिलेला होता. विभागणी कशी झालेली आहे याच्यामध्ये थोडा Confusion आहे. त्याच्यामुळे पुर्ण शहरामध्ये मजुर पोहचत नाही आणि आता जे आपले विरोधीपक्षाने जे आरोप केलेला आहे. भाजपचे नगरसेवक बोलत नाही आणि ते समाधानी आहे. तर सर्व भाजपच्या नगरसेवकांच्या वार्डातपण तेवढीच घान आहे. आम्ही तुम्हाला बोलायचा चान्स दिला होता. आणि तुमचा मांडलेला प्रश्न योग्य होता म्हणुन आम्ही ऐकत होते.

**श्री.इब्राहिम पटेल :-** आम्हीपण समस्याच मांडल्या.

**सौ.ज्याती चव्हाण :-** आता प्रशांत भाऊ बोलले की आम्ही बोलत नाही.

**ॲड.शुचिता हाडा :-** या सर्वांमध्ये महत्वाचा मुद्दाच मागे राहतो, झाले काय आहे, एकमुस्त ठेका दिलेला आहे वॉटरग्रेस या नाशिकच्या कंपनीला. मला वाटत एकही नगरसेवक नाही जो या कंपनीच्या कामाने समाधानी आहे. असेल तर सांगा. इबा भाऊ तुम्ही सांगत होते आम्ही शांतपणे ऐकत होते याचा गैरअर्थ काढु नका. तुमचं आणि आमच एक मत होतं या विषयावर म्हणुन आम्ही शांतपणे ऐकत होतो. त्यानंतर जर तुम्ही असेच आरोप करत असाल तर हे असच चालु राहील. तर याच्यात काय होईल मक्तेदाराचा फायदा होईल. ज्याच्याशी आपली नाराजी आहे त्याबद्दल आपण बोलु आता. पाटील साहेब हे जो ठेका आपण दिलेला आहे. याचा आपण एक ॲग्रीमेंट बनविलेला आहे. आपण सर्वांनी जर ऐकले तर शक्य होईल नाही तर फक्त गोंधळाची परिस्थिती निर्माण होईल. काहीच मार्ग निघणार नाही. डॉक्टर साहेब आपण एक ॲग्रीमेंट केलेला आहे आणि अटीशर्ती लागु केलेल्या होत्या. त्या अटीशर्तीची पुर्तता मक्तेदाराने डे वन ज्या गोष्टी त्यानी करायच्या होत्या. ते त्यानी पुर्ण केलेले आहे का?

**आरोग्याधिकारी :-** डे वन पासुन त्यांनी हे सर्व करायच्या होत्या. परंतु जी परिस्थिती झाली ती तुमच्या डोळयांच्या समोर आहे.

**श्री.रियाज बागवान :-** डॉक्टर साहब जोर से बोलिए सुनाई नही दे रहा है.

**आरोग्याधिकारी :-** त्यातील एक अट होती. मॅन्युअल तयार करायचं, जी.पी.एस.यंत्रणा लावायची त्याची तीन महिन्याची मुदत दिलेली होती. त्याची मुदत संपल्यानंतर जी गोष्ट दंडणीय आहे की कामगार पुरविणे, कचरा उचलणे यात आपण त्याला दंड केलेले आहे. त्यापैकी जे कामे त्यांनी केले नाही म्हणुन पण आपण त्याला दंड केलेला आहे.

**ॲड.शुचिता हाडा :-** आता आपण जे हे मक्तेदाराच बिल अदा करुन टाकलेल आहे. ज्या बद्दल सर्व नगरसेवकांची नाराजी आहे. प्रशासनाने मक्तेदाराचे बिल अदा केल. मला फक्त बोलुन घेऊ द्या. या बिला बद्दल आपण एक टिप्पणी तयार केलेली आहे. त्याच्यावरुन मी सर्वांच्या लक्षात ही गोष्ट आणुन देते की, दि.०६/०६/२०१९ च्या महासभेसमोर हा विषय आला. त्या कंपनी ला आपल्या ठरावानुसार मंजुरी दिली होती. म्हणजे जुन मध्ये. म्हणजे हे जे टेंडर भरलेल असणार ते जुनच्या पहिले भरलेल असणार. हा काही छोटा ठेका नाही. एक मुस्त पध्दतीचा ठेका आहे. संपुर्ण शहरासाठी आपण देत आहे. जे काही ठेकेदार येणार होते ते सर्वे मोठेच ठेकेदार येणार होते. ज्यांची Capacity आहे ऐवढे मोठे काम करण्याची. बरोबर. त्या दृष्टीने त्यांनी तशी पाऊले उचलायला हवी होती. दि.०६ जुन २०१९ ला आपण हा ठराव मान्य केलेला आहे. त्यानंतर दि.०६ जुलै २०१९ ला स्थायी समिती समोर मान्य झालेला आहे. आणि दि.१४/०८/२०१९ ला आपण त्याला संविदा नोंद केली आहे. आणि त्याच तारखेला वर्कऑर्डर दिली आहे. त्यांनतर आपली जी टिप्पणी आहे. ते कसे ठेकेदाराचा जे फेलियुअर आहे म्हणजे अधिकाऱ्यांना कसा ठेकेदाराने पाठीशी करुन घेतलेल. ठेकेदाराने अस नमुद केलेल आहे आपल्या पत्रात की आम्हाला खुप कमी वेळ मिळाला आम्हाला पुर्व तयारीसाठी. आता येथे कमी कालावधी मिळाला पुर्व तयारीसाठी असे जर म्हटले तर इतके हास्यस्पद आहे. जेव्हा त्यानी टेंडर भरलं. तेव्हाच त्यांनी त्याची तयार त्याच्या लेव्हलला सुरु करायला पाहिजे होती. ठिक आहे तो L१ येतो की नाही, त्याला टेंडर मिळतं की नाही याच्यासाठी तो थांबला होता. महासभेच्या ठरावानंतर जुन पासुन त्याला माहित होतं की हे टेंडर त्याला जाणार आहे. महासभेत प्रस्ताव आले नंतर हे उघड झालेल होत की हे कार्यादेश प्रोसिजरनुसार त्याला जाणार आहे.त्या दिवसापासुन त्यानी ती तयारी सुरु करायला हवी होती. मग वर्कऑर्डर हातात गेली इतकच बाहाना होता. इतका मोठा जो ठेकेदार असतो त्याला वर्कऑर्डर दिल्यापासुन त्यात काम करण्याची कुवत पाहिजे. हे गृहीतच असतं. त्यानी जे लिहलेल आहे की आमची तयारी नव्हती आणि तरी प्रशासनाने आम्हाला घाईघाईने आदेश दिले. म्हणुन आमच्या साईडने फेल्युअर

होत आहे. आणि हे प्रशासन मान्य करतो हे ही हास्यस्पद आहे. त्याला पाठीशी घातल जात आहे माझं जे ऑबजक्शन आहे की असं व्हायला नको. आज ठेकेदाराचे कोण प्रतिनिधी आलेले आहे येथे. काय नाव आपलं ?

**श्री.शंतनु बोरसे (आरोग्य मक्तेदार प्रतिनिधी) :-** मी शंतनु बोरसे, मी नाशिक विभाग बघत असतो.आता जळगांवात मी बरेच तीन महिन्यापासुन थांबलेलो आहे.

**ॲड.शुचिता हाडा :-** आपल्याकडे आय.कार्ड आहे का ?

**श्री.शंतनु बोरसे (आरोग्य मक्तेदार प्रतिनिधी) :-** हो आय कार्ड आहे.

**सौ.ॲड.शुचिता हाडा :-** आता जितके कार्यरत कर्मचारी आहे आपण सर्वांना आय कार्ड दिलेल आहे का ?

**श्री.शंतनु बोरसे (आरोग्य मक्तेदार प्रतिनिधी) :-** कंपनीला येथे आता उद्या तीन महिने होतील कामाला, त्यांना आय कार्ड दिले गेले, ड्रेसकोड दिले गेले त्यांचे बँक अकाऊंट उघडायचे चालु आहे आता.

**ॲड.शुचिता हाडा :-** अजुन ही चालु आहे प्रशासनाने व सभागृहाने याची नोंद घ्यावी. ड्रेसकोड ही नाही, म्हणजे तीन महिने होत आहे आता. आणि तरी सुध्दा हे सर्व गोष्टी सुरुच आहे.

श्री.इब्राहिम पटेल :- ड्रेसकोड नाही असेल तर फोटो दाखवा, खोटे बोलत आहे ते.

**ॲड.शुचिता हाडा :-** इबा भाई मला बोलुन घेऊ द्या मग तुम्ही बोला, त्यांनी कबुल केलं की ड्रेसकोड नाही. या सर्व गोष्टीं आता ते करत आहे. आपला ३२ नंबरचा एक क्लॉज आहे त्यात काय म्हणतो आपण की त्यांना नियमानुसार सगळं सुस्थितीत करण्यासाठी आपण ३ महिन्याचा कालावधी दिलेला होता आणि त्या काही गोष्टींसाठी आपल्याला ३ महिनेपर्यंत ते करता येणार नव्हत. कोणत्याही गोष्टींसाठी दंड करण्यात येणार नव्हता. डे वन पासुन घंटागाडी त्यांची वेळेवर जायलाच हवी होती. त्याचा ड्रायव्हर आहे नाही हे त्यांचा लुकाऊट आहे. याच्याशी प्रशासनाला काही मिळविलेल नाही. आपण ते सुध्दा त्यांचे ते दंड सोडुन दिलेले आहे. किती दिवस राहिले आहे उद्याच्याच दिवशी ३ महिने होत आहे. तीन महिन्यापर्यंत यांना या किरकोळ बाबींचा जे मी आता आपल्याला सांगितले. आय कार्ड नाही. ड्रेसकोड नाही. या गोष्टींसाठी समजु शकतो आपण. पण कचरा संकलन ही जी सगळयात महत्वाची बाब आहे याच्यावर पण दंड आकारायचा नाही का ? किंवा त्याच्यावर सुध्दा त्यांना सवलत द्यायची आहे का ? हे चुकीच आहे. डॉक्टर साहेब आपण आपल्या टिप्पणी मध्ये काही गोष्टींवर प्रशासनाचा सुध्दा काही जागेवर आपण फेल्युअर दाखविलेल आहे. माझं तर स्ट्रॉंग ऑबजेक्शन आहे या मुद्दयाला धरुन असे की प्रशासनाने रॅम्प तयार करुन दिला नाही, प्रशासनाने वजन काटे पुरविले नाही. ऐवढा मोठा ठेकेदार आहे. प्रशासनाचे काही टेक्नीकल गोष्टींचा फॉलोअप घेतल्या शिवाय, टेक्नीकॅलिटीज पुर्ण केल्याशिवाय काही गोष्टी करता येत नाही. जो पर्यंत आपण प्रोसिजर कराल तो पर्यंत तुम्ही वजन काटा आनु शकत होते. आणि माझ्या माहितीप्रमाणे ओरली हे बोलणं आपल झाल होता. कार्यादेश दिल्यानंतर ठेकेदारानेही मान्य केलं होतं. मी वजन काटा आणतो. हे जे आता दाखविता आहे. की वजन काटा या दिशेला आहे, डंपींग ग्राऊंड इकडे आहे म्हणुन आमची गाडी इकडे जाते मग तिकडे जाते. या मध्ये जो वेळ जातो, गाडींचा घसारा होतो, गाडींच नुकसान होत. आणि परत आपल्याला नैसर्गिक आपत्ती की पाऊसाळा होता म्हणुन थांबला होता. या सगळे कारणामुळे आपण हे करु शकलो नाही. आमची घंटागाडी गेली, वजन करुन तिकडे डंपींग केलं. त्यानंतर ती वार्डात पुन्हा येऊ शकली नाही. जेथे चार अपेक्षित होत्या तिथे दोन झाल्या, दोन अपेक्षित होत्या एक झाली. तर हे त्यांचा फेल्युअर ते आपल्या पाठी मारत आहे. हे त्यांच फेल्युअर होतं. रॅम्प सुध्दा ते करुन घेऊ शकत होते. एक लोखंडी अँगलचा रॅम्प आणला असता. वजन काटयाचा अजुन नाही. डॉक्टर साहेब मला एक माहिती द्या तुम्ही आपल्याकडे किती कॅम्पॅक्टर आहे.

**आरोग्याधिकारी :-** दहा कॅम्पॅक्टर आहेत.

**ॲड.शुचिता हाडा :-** एका कॅम्पॅक्टर मध्ये किती घंटागाडयांचा कचरा भरु शकतो ? अंदाजे सांगा.

**आरोग्याधिकारी :-** अंदाजे २०-२२ घंटागाडयांचा भरु शकतो.

**ॲड.शुचिता हाडा :-** मग हे पर्याय काढणे अधिकारीच सुध्दा काम होतं. त्यांनी हे पर्याय सुचवायला हवे होते किंवा इमप्लीमेंट करायला हवे होते. एक एक घंटागाडी वजन करायला का जाते तुमची तितपर्यंत. दर वेळेला चार कॅम्पॅक्टर चार ठेवा दोन दोन ठेवा एका बाजुने उभे करा. आठ कॅम्पॅक्टर तुम्ही ठेवा घंटागाडी त्यात लोड करा.कॅम्पॅक्टर जाईल वजन काटयावर. घंटागाडया ताबडतोब जातील पून्हा वार्डामध्ये. या गोष्टी आपण करु शकत होतो. येथे इच्छा शक्तीचा आपला अभाव होता.आपण सतत काय करत आलेलो आहे, प्रशासन काय करत आहे, ठेकेदाराला पाठीशी घालत आलेले आहे. त्याचे बिलाचे कारण आपण या ठिकाणी दिलेले आहे की, दिवाळी तोंडावर होती. त्यांचे माणसांचे पगार दिलेले नव्हते. मान्य आहे. अगदी मान्य तो शेवटी हातमजुरी करणारा वर्ग असतो. हातमजुरी करतो त्यांच्या पोटावर पाय देण्याचा आमच्या पैकी कोणाचाच विचार नाही. आजच्या तारखेत सुध्दा त्यांना सगळा पगार दिलेला आहे का ? काम सुरु झाल्यापासुन आज पर्यंत, दिलेला नाही. त्यांना अजुनही पगार दिलेला नाही. ही जी एक अट ज्यासाठी आपण बिल त्यांच

काढुन दिलेल आहे, बिल अदा केलेल आहे की दिवाळीच्या तोंडावर त्या मजुरांचे हाल होऊ नये. आणि मजुर जर काम सोडुन गेले तर ठेका बंद पडेल. ही ठेकेदाराची जबाबदारी असते. ठेकेदार कोणताही घेतांना त्याची पत बघीतली जाते. ती का बघीतली जाते. त्याची Holding Capacity असावी. कोणताही ठेका घेतल्यानंतर त्याची ती अदायगी होई पर्यंत त्याची Holding Capacity असावी लागते. ह्या सर्व गोष्टींचा विचार यांनी केलेला नाही. त्यांची बिल अदायगी करण्याची इतकी घाई का करण्यात आली. जर आपला वकीलांचा पॅनल आहे बरं मोठं पॅनल आहे. आपण वकीलाला विचारतो का या बद्दल सल्ला घेतला का वकीलांचा की अस अस ॲग्रीमेंट आहे.आता याची अशी अशी मागणी आलेली आहे. आपण काय केलं पाहिजे. विधी समिती प्रमुख म्हणुन मी स्वत: आहे. माझ्याकडे सुध्दा आपण आले नाही. तेव्हा स्थायी समिती सभापती मी नव्हते पण विधी समिती प्रमुख मी नक्कीच होते. आपण मला एक शब्द विचारु शकत होता. सल्ला घेऊ शकत होता. आपण आपल्या लेव्हलवर पुर्ण टिप्पणी तयार केलेली आहे. या टिप्पणी मध्ये माझा स्पष्ट आरोप आहे की अधिकाऱ्यांनी ठेकेदाराला पाठीशी घातलेलं आहे. यामुळे झालं काय ? सगळया लोकप्रतिनिधींबद्दल गैरसमज पसरत गेलेला आहे. लोकप्रतिनिधींचा याच्यात हात आहे. लोकप्रतिनिधींचा याच्यात सहभाग आहे. आणि याला पाठीशी घालण्याच कारण काय ? यात आपली जी टिप्पणी आहे या टिप्पणी मध्ये आपण म्हटलो आहे. सबब ज्या प्रकारे करारनाम्यात नविन प्रकारे नमुद आहे. आरोग्य निरिक्षक यांनी करारनाम्याच्या अटीशर्ती प्रमाणे दंडाची आकारणी करुन अहवाल सादर केलेला आहे. तसेच काम सुरळीत चालणे गरजेचे असल्याने सण उत्सवाचा कालावधी असल्याने कामगारांना वेतन देणे आवश्यक असल्याने देयक अदायगी बाबत विनंती केलेली आहे. यामध्ये त्यांनी दंड आकारणीच्या स्थितीबाबत सक्षम अधिकारी यांच्याकडे सुनावणी घेऊन निर्णय घेणे योग्य होईल असे वाटते. सक्षम अधिकारी कडे सुनावणी घेणे, सुनावणी घेण्याची यात गरज का वाटली आपल्याला.त्याला मागेही आपल्या ई.एस.आय. व सी.एस.आय यांनी त्याला दंड लावलेला होता. ते आम्ही दररोजच्या वर्तमानपत्रातुन बातम्या वाचत होतो. त्याला लाखोचा दंड त्यात लावण्यात आलेला होता आणि तो या टिप्पणीनंतर कमी झालेला आहे. ही बाब प्रशासकीय अधिकारी बद्दल सुध्दा प्रचंड मोठा संभ्रम निर्माण करते. असं का घडलं. तुमची टिप्पणी सुध्दा आहे याच्यामध्ये. उपायुक्त साहेबांची टिप्पणी आहे ही, त्याच्यात क्लॉज नं.१ ला ते असे म्हणतात की, ठेकेदाराला कचरा गोळा करणे, वाहतुक करणे, रस्ते गटार स्वच्छते कामी कामगार पुरविणे, कामासाठी पुरेशी यंत्रणा पुरविणे व अनुषंगीक बाबींची पुर्तता करणे बंधनकारक आहे. त्यांची पुर्तता न झाल्याने पहिल्या दिवसापासुन दंड वसुल करणे आवश्यक आहे. तो टिप्पणीत प्रस्तावीत केलेला आहे. मग टिप्पणीची काही गरज आहे का आणि जे रोज पेपरमध्ये बातम्या येत होत्या तो दंड त्याच्यात सुध्दा तफावत दिसतेय .बर मागे मी माहिती घेतली होती की मला असं सांगण्यात आलं की या गोष्टींचा दंड आपण नंतर सुध्दा लावु शकतो. तसे सुध्दा आकारू शकतो. आज त्याला पेमेंट देणं आवश्यक होत.पुन्हा हया सगळया बाबी निर्धारीत आहेत .सण आहे कामकाज आहे शहराचे पुन्हा हाल होतील वगैरे पण मग ते असं करायचं आहे का की साप आला सापाला निघुन जाऊ द्यायचं आणि मग आता तो परत दिसला की आता त्याला आम्ही झोडपुन काढणार किंवा अगदी त्याला मारूनही टाकणार. म्हणजे साप दिसतोय त्याला मारायचं नाही त्याला आधी जाऊ द्यायचं .या ज्या सगळया टिप्पण्या आहेत त्या सगळया अत्यंत संशयास्पद आहेत. त्याच्यामध्ये मला महापौर ताईंना एक विनंती अशी करायची आहे. सगळया सदस्यांची जी नाराजी दिसते आहे . या नाराजीचा आपण विचार करता म्हणजे माझं अस सजेशन राहील ईथे की आपण यासाठी एक समिती गठीत करावी .यात सगळयात पहिले जी गोष्ट राहील की ईथुन पुढे आता सभागृहामध्ये टप्प्या टप्प्याने चर्चा होते आहे.की या ठेक्याचं भविष्य आपण ठरवायचं त्याच्या मध्ये आयुक्त साहेब आपल्याला कायदेशीर मार्गदर्शन सुध्दा करतील. हा ठेका रद्द करायचा आहे तर तो आपण किती लवकरात लवकर रद्द करू शकु कोणत्या गोष्टींनी करू शकतो तेही मार्गदर्शन आपण घेवुच . कंन्टीन्यु ठेवायचा आहे सगळया आधी सगळया महत्वाच नगरसेवकांच नगरसेवक डायरी आधी सुरू करा. नगरसेवक डायरी सुरू करा. नगरसेवकांच्या सहया घ्या. समाधानकारक रिपोर्ट जोपर्यंत नगरसेवक देत नाही तो पर्यंत या ठेकेदाराच्या पुढच्या बिलाबाबत निर्णय घेऊ नका. आणि चार चार नगरसेवक आहे प्रत्येक वार्डाला, चारही नगरसेवकांचा समाधानकारक रिपोर्ट असला पाहिजे. मला वाटतं या बद्दल एकात्मता आहे. कारण सगळे जण आपण इतके त्रस्त आहोत की आपल्याला वार्डात सुखाने फिरण्याची सोय नाही. काल भगतभाऊच बोलले होते की कार मध्ये जातांना सुध्दा तोंड लपवुन फिराव लागत आहे. ही अशी परिस्थिती आज सभागृहावर आलेली आहे. इतकी काळजीवाईट परिस्थिती आहे की लागोपाट कचऱ्याचे ढिग पडलेले आहे. अजुन

एक मुद्दा राहुन गेला होता. वजन जे वजन वाढलेल आहे कायम कचऱ्याचा स्थायीच्या कालच्या मिटींगमध्ये विष्णु भाऊंनी व नितीन भाऊंनी जे विषय मांडलेलं होते. जी त्याची कॅपॅसीटी आहे त्यापेक्षा जास्त कचरा त्यात भरला आहे. कुठुन भरला, कसा भरला, या सर्व गोष्टी वेळोवेळी आपल्या लक्षात आल्या नाही का ? आपल्या व उपायुक्तांच्या का लक्षात आल्या नाही. कश्या लक्षात आल्या नाही. आणि त्या वर ताबडतोब कार्यवाही का केली नाही. म्हणजे लोकप्रतिनिधी कधी हे लक्षात आणुन देतील. त्या बद्दल आरडाओरडा करतील. त्यानंतर आपण सांगाल की हो बघतो माहिती घेतो मग कार्यवाही करतो. हे उत्तर कितपर्यंत योग्य आहे. एका सक्षम अधिकाऱ्यानी हे उत्तर देणं कितपर योग्य आहे. हे आमची ठट्टा चालवली आहे का येथे. आपण यासाठी एक चौकशी समिती नेमावी महापौरताई व उपमहापौर माझी अशी विनंती आहे की आपण एक समिती येथे गठीत करावी की जी या सर्व कायदेशीर बाबींचा अभ्यास करेल. त्यात आपण विरोधीपक्षाचे सदस्य घ्या, एमआयएमचे सदस्य घ्या. आपल्यातले सदस्य घ्या. आजपर्यंत त्या ठेकेदाराने कोणत्याच गोष्टींची पुर्तता केलेली नाही. त्यांचे वर्कर्सला युनिफार्म पुरविणे आहे, गमबुट पुरविणे आहे. ग्लोज आहे. आता मिटींगला येता येता माझ्या घरासमोर घंटागाडी आली काहीच नाही. त्या घंटागाडीवर जे कर्मचारी आहे ते त्यांच्या साध्या ड्रेस मध्ये होते. त्यांच्याकडे कंपनीचा कोणताही आयकार्ड नाही, युनिफार्म नाही. मला असे अपेक्षीत होते की आज महासभा आहे आठ दिवसापासुन पेपर रंगत आहे की महासभा या मुद्दयावर गाजणार. ते घाई घाईने या आठ दिवसात वॉटर ग्रेस ही पुर्तता करणार. परंतु वॉटर ग्रेस इतके शांत बसले आहे कारण त्यांना माहित आहे की आपले रक्षण करणारे येथे बसलेले आहे. शांत आहे त्यांच्या End ने काही गडबड नाही धावपळ नाही. काही नाही. अजुन ही कितीही गोष्टींची पुर्तता नाही. ते जी.पी.एस.सि.स्टीमचा टाकलं का डॉक्टर साहेब. आपण होता त्या दिवशी आमदार साहेबांनी रात्री ८.०० वाजता बैठक घेतली होती. त्यावेळेला वॉटरग्रेसचे प्रतिनिधी होते तिथे. मला वाटतं भंडारीजी आले होते त्या दिवशी. त्यांनी काय सांगितलं होतं उद्या ते आपल्या महानगरपालिकेत कार्यान्वीत होईल. चार दिवस झाले त्या गोष्टीला. अजुनही ते शांतपणे सांगत आहे की चालु आहे. चालु आहे या शब्दाला काही लिमिटेशनच नाही. चालु आहे. केव्हा होईल हे काम कोण ठरविणार हे काम आता. ही जी क्रमांक ३२ ची जी अट आहे ती फक्त लहान लहान गोष्टींसाठी आहे. आणि ही तुम्ही अतिशय समजदार पध्दतीने वापरलेली आहे सगळया महत्वाच्या गोष्टींसाठी की ३२ नंबरचा क्लॉज आहे आपण त्याला दंड करु शकत नाही. ३२ नंबरचा क्लॉज आहे. आपण दंड करु शकतो पहिल्या दिवसापासुन आपण दंड करु शकतो. आणि तश्या आपल्या ए.एस.आय.व सि.एस.आय. ने आपल्याला रिपोर्टस दिले. त्या रिपोर्ट नंतर तुम्ही दंड कमी कसे केले. कोणत्या आधारावर कमी केले. काही विधी समितीचा अहवाल आहे आपल्याकडे, काही वकीलांचा तुम्ही सल्ला घेतला होता की हे जे आम्हाला उत्तर दिला जाते की, आपण नंतर अपलाय करु ना दंड त्यांच्यावर. नंतर कस अपलाय करणार. कोणत्या मद्दयांवर अपलाय करणार. तुमच्या ए.एस.आय. व सी.एस.आय.ला प्रशिक्षण दिल नव्हत का तुम्ही की कोणत्या गोष्टींवर दंड लावायचा.

**आरोग्याधिकारी :-** प्रशिक्षण दिलेल होत.

**ॲड.शुचिता हाडा :-** प्रशिक्षण दिलेल होत. याचा अर्थ दंडाच्या ज्या पावत्या त्यांनी बनविल्या त्या तुमच्याकडे येत होत्या. डेली येत होत्या.

**आरोग्याधिकारी :-** हो येत होत्या.

**ॲड.शुचिता हाडा :-** डेली यायच्या ना , मग डेली येत होत्या तर मग त्या दिवशी रद्द का नाही झाल.

**आरोग्याधिकारी :-** या सर्व बाबींसाठी ते लोक उपायुक्त साहेबांकडे यायचे त्यांनी .

**ॲड.शुचिता हाडा :-** डॉ.साहेब मला विचारायच कारण हे एक आहे की हे जे रिपोर्ट आहेत हयांच्यावर आरोग्याधिकारी म्हणुन तुमच्या सहया आहेत यांच्यावर आणि ही अशी टोलवा टोलवी चालते याचे उत्तर यांनी द्याव आणि त्याच उत्तर त्यांनी द्याव मी येथे बोललेली आहे की हे नमुद करावं . आता नवनाथ भाऊंनी माझ्याकडे दंडाच्या आकारणीचे तक्ते दिलेले आहेत. दोन लक्ष पंचानऊ हजार सन्मा .सदस्यांना विनंती आहे आपण जो मुद्दा चालु आहे तो सोडुन ईतर मुद्दयांच्या बाबतीत भांडत बसलो तर होणार नाही आपल्याला ५ वर्ष आहेत भांडायला.आपण भांडण नंतर करू शकतो . हा जळगांवचा खुप मोठा प्रश्न आहे. आपण आधी त्याच्याबद्दल लक्षपुर्वक काय होत आहे की लक्ष विचलीत होत यांना सुकर होत.विषय गुडाळला जातो . विषय गुडाळण्यात जाऊ नका तुमचा आणि हा विषय सारखा आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** ताई तुम्ही ईतके ओरडुन सांगताहेत त्यात विकास पाटील किती सिरीयस आहेत ते बघा .

**ॲड.शुचिता हाडा :-** त्यांनाच विचारायचं आहे की , याच उत्तर ते देत आहेत ते चांगलच देतील . महापौर ताई आणि उपमहापौर साहेब .

**श्री.कैलास सोनवणे :-** त्यांना बोलु द्या त्यानंतर ज्याच्यावर आरोप झालेले आहेत त्यांनी ईथे खुलासा करायचा. त्यांचे पॉईंट लिहुन ठेवा ताई तुम्ही पण लक्षात ठेवा .ते पॉईंट लिहुन घ्या. जे आरोप झालेले आहेत ना त्यांचा खुलासा करा .

**ॲड.शुचिता हाडा :-** अश्विनभाऊंनी पत्र दिलेले होते म्हणजे उपमहापौर खुप मोठ पद आहे . त्यांच्या पत्राची सुध्दा प्रशासन दखल घेत नसेल तर आपल्या सगळयांच ऐकलच जाणार नाहीये उपमहापौरांनी पत्र दिलेले होत की याच बिल अदा करू नये .उपमहापौर साहेब तुम्हाला विचारल होत का हे बिल अदा करतांना म्हणजे या ज्यास काही सोपस्कर ॲडजेस्टमेंट झाल्यानंतर तुम्हाला कल्पना द्यायला हवी होती का या देयकाची म्हणजे उपमहापौर यांचा आक्षेप होता . महापौर ताईंचा सुध्दा कायमच विरोध होता .आमचे जे आमदार आहेत त्यांची सध्दा ओरड होती या कामाबद्दल की काम समाधानकारक होत नाहीये. काम ज्या वेगाने होत आहे त्या वेगाने होत नाहीये .ज्या कामात सुधारणा अपेक्षित आहे .अनेक वेळा नोटीसेस देवुन दंड बजावुन सुध्दा त्या होत नाहीये आणि एवढे सर्व असतांना बिल अदायगी एवढया घाई घाईने का केली .

**श्री.धिरज सोनवणे :-** प्रशासनाची चिरीमीरी पास होण्यासाठी ते बिल अदा झालेले आहे.

**ॲड.शुचिता हाडा :-** आता हा एक प्रशासनावर आरोप केलेला आहे याच उत्तर प्रशासनाने द्यायच आहे. याच्यात होत काय आहे की आमच्या बद्दल सुध्दा गैरसमज पसरताहेत समाजात नागरीकांमध्ये आता सगळया नगरसेविका आहेत हया सगळया नगरसेविकांची प्रचंड नाराजी आहे .प्रचंड ओरड आहे या ठेक्याबद्दलची आणि त्याच काम अत्यंत असमाधानकारक असतांना सुध्दा आपण हे बिल अदा केलेल आहे. या टिप्पणीचा अभ्यास काही जणांनी केलेला नसणार आहे. हि टिप्पणी अत्यंत गोल गोल बनविण्यात आलेली आहे. याला फक्त त्याला आपण ईन्टरफीकेशन म्हणतो आपण त्याला सर ईन्टरफीकेशन म्हणजे आपण नेमक काय करायच .कामात सुधारणा होई पर्यंत की तीन महिन्याचा कालावधी म्हणजे सर्व यंत्रणा सुरळीत होण्यासाठी , यंत्रणा सुरळीत होणे म्हणजे याचा अर्थ असा असतो का की आज ड्रायव्हर आला नाही आज वॉर्डात घंटागाडी येणार नाही. ईथे कुठेतरी मी वाचल आत्ता कि घंटागाडी आली नाही तर किती दंड या प्रत्येकासाठी आपण ईथे एक अमाऊंट फीक्स केलेली आहे . ॲग्रीमेंट खुप चांगल आहे आपल , खुप अभ्यास पुर्ण आहे.हे सगळ काही असतांना आपल्या एस.आय , सि.एस.आय लोकांनी जबाबदारीने त्याला दंडा ठोठावलेला असतांना तो त्याच्याकडुन त्याच्या बिलाच्या अदायगी मध्ये वसुल करण्यात आलेला नाही .हि खुप सिरीयस बाब आहे . याच वोटींग व्हाव ईथुन पुढे नगरसेवक डायरी बंधनकारक करावी.आजच्या आज काय होत नगरसेवकांचा प्रस्ताव प्रत्येक महासभेला आलेला आहे सगळयांनी ऑर्डर केलेली आहे आपण सगळयांनी फक्त हो म्हंटलेल आहे. पण राईटींग मध्ये घेतल्या गेलेला नाही. तो प्रस्ताव तसाच राहीला .तो आधी घ्यावा एक समिती त्यासाठी गठीत करावी. आणि येथुन पुढच बिल त्याच निघणार नाही. एका मुद्दयाच्या बाबतीत पुढे कैलास अप्पा बोलतील.

**श्री.कैलास सोनवणे :-** प्रशासनाच बोलनं ऐकुन घेऊ त्यांच्यावर आरोप झालेले आहे.

**श्री.रियाज बागवान :-** सब नगरसेवक इससे खुश नही है संतुष्ट नही है. अधिकारीओं का मुझे नही मालुम तो हमारा बोलना है की ये ठेका रद्द करो.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेबा प्रशासनावर आरोप केलेले आहे सभापती, स्थायी समिती यांनी, तर काही नाही दोन तिन आरोप आहे, प्रशासनाने उत्तर द्यावे. त्यानंतर कोणाला काही बोलायचे असेल तर बोला. पण मला वाटत नाही की इतके डिप मध्ये बोलल्यानंतर कोणी बोलेल. शुचिताताई हाडांनी या ठिकाणी आज जे इतकं अभ्यास केलेलं आहे. तर खरोखर भारतीय जनता पक्षाला त्यांच्यावर अभिमान आहे. त्यांची सभापती म्हणुन काही एक चुक केलेली नाही भारतीय जनता पक्षाला याचा अभिमान आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** आम्हालापण अभिमान आहे. सभागृहाला माझी विनंती आहे की कॅन्ट्रक्टरला एका महिन्याचा कालावधी द्यावा आणि त्यानंतर त्यांना ब्लॅकलिस्ट करुन टाका.

**श्री.कैलास सोनवणे :-** त्यांना जर एक महिन्याची मुदत देणार तर ब्लॅकलिस्ट कसे करणार.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सन्मा.सभागृह मला वॉटरग्रेसचे जे प्रतिनिधी आहे त्यांना विचारायचे आहे की, सन्मा.सदस्या शुचिताताई हाडांनी जे शेवटचा मुद्दा सांगितला, मला सांगा डॉक्टरसाहेब ठेकेदाराने जे ट्रॅक्टर सांगितल एका ट्रॅक्टरमध्ये

कचरा उचलायचं आणि जळगांवा बाहेर पोहचवायच. आपल्याकडे जे रिपोर्टस आहे त्याच्यात कमीत कमी किती आणि जास्तीत जास्त किती कचरा उचलु शकता आणि किती टन गेलेलं आहे.

**डॉ.विकास पाटील :-** साहेब आपण त्याला दंड केलेला आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** नाही नाही साहेब मी दंडाच विचारत नाहीये तुम्हाला , तुम्हाला विचारतो काही आहे तुम्ही सांगता काही आहे.तुम्हाला माहिती आहे का वजन वाढल होतं मागे त्या गाडी मध्ये वाळु भरून ट्रॅक्टर गेलं होतं मग ते कस काय माहिती नाही तुम्हाला ते ही पांडे चौकात मग ट्रॅक्टर मध्ये वाळुचं आलचं कुठुन तरी त्याच्यात ओला कचरा वेगळा व सुका कचरा वेगळा येतो साहेब मग ट्रॅक्टरचे वजन आलं कस आता तुम्ही सांगीतलं आणि आमच्या माहितीनुसार वजन भरू शकते व होवु शकतं पण त्या पण 9/9 टनापर्यंत वजन येतं होतं ट्रॅक्टरची कॅपेसिटीचं नाही ऐवढा लोड घेवुन जायची त्याचे चाकच निघुन जातील 9 टन कचरा भरून घेवुन जाईल . तर म्हणजे आपले जे ॲग्रीमेंट झाले आहे पध्दतीनुसार याच्यातुन मी तुम्हाला सांगतो की आपण मक्तेदाराला जे पैसे देतोय ते पैसे आपण टनाच्या हिशोबाने देतोय म्हणुन त्याने काही पण मनमर्जीने करावे का हिशोबामध्ये आपण जे अधिकार आहेत आपण स्वत: तिथे जावुन बघितलं तर वजन काटयावर जावुन आपण किती वेळा बघितलं आहे की त्याचं वजन किती येत ते खरं आहे की खोटं आहे .मग साहेब याला सर्वस्वी जबाबदार कोण आहे. या गोष्टीचं उत्तर **दया** तुम्ही .

**मा.उपायुक्त (आरोग्य) :-** मा.महापौर , मा. आयुक्त व मा.सभागृह या संबंधी वॉटर ग्रेस कंपनीचे काम ऑगस्ट मध्ये सुरू झाल्यानंतर त्यांनी.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** तुम्ही दुसऱ्या विषयावर बोलु नका साहेब त्यांनी विचारले आहे त्या विषयावरच तुम्ही बोला.

**मा.उपायुक्त (आरोग्य) :-** मा स्थायी समिती सभापती यांनी सुध्दा विचारले होते व आपण विचारले आहे तर मी आपल्या प्रश्नाकडे येतो. ऑगस्ट मध्ये वॉटर ग्रेस ने काम सुरू केल्यानंतर आपण त्याला 9 **वार्डा**मध्ये काम करायला परवानगी दिली .आणि 21 ऑगस्ट ला कंम्पोस्ट चे काम करायला त्याने सुरूवात केलेली आहे. करारातील अटी शर्ती प्रमाणे त्याने ज्या गोष्टी करायच्या होत्या त्या त्याने नियमाप्रमाणे पुरविलेल्या नाही . आज रोजी सुध्दा त्याने अटी शर्ती पुर्ण केलेल्या नाहीत .याबद्दल आम्ही त्याला नोटीसी सुध्दा दिल्या आहेत .आपण त्यांना 3 नोटीस दिलेल्या आहेत म्हणजे 3 पत्रापैकी एक नोटीस आहे व दोन पत्र आहेत.आता अंतिम नोटीस जी त्याला द्यायची आहे ती आम्ही तयार केलेली आहे.मा.आयुक्त सो यांच्या मंजुरीनंतर ती आम्ही इश्यु करणार आहोत. आणि त्या कंपनीला 150 गाडया म्हणजे घंटा गाडी आणि ट्रॅक्टर अशा 150 गाडया आणि 700 लेबर ते आपल्याला त्यात गटार लेबर असेल झाडु लेबर असेल रस्ते व गटार सफाई साठी दिले, परंतु मॅनेजमेंट पाहणारा कोणताही सक्षम कर्मचारी या ठिकाणी पहिल्या दिवसापासुन उपलब्ध नाही. कामगारांची संख्या पाहता पहिल्या दिवसापासुन पुरविलेली नाही . मा.सभापती महोदयांनी विचारलेल्या प्रश्नांवर मी त्यांना किंवा त्यांच्या मालकांनाही समक्ष जागेवर जाऊन सांगीतले की , घंटागाडी वजन काटयावर दरवेळी पाठविण्याची गरज नाही . कारण घंटागाडी कॉम्पॅक्टर मध्ये रिकामी केल्यानंतर फक्त कॉम्पॅक्टर पुर्ण भरल्यानंतर हि सिंगल गाडी काटयावर जाईल. परंतु त्यांनी त्यांचे समक्ष होकार दर्शविला आणि मग नंतर त्याची पुर्तता कोणत्याही प्रकारची झालेली नाही.त्यांचे जे आजचे प्रतिनिधी आहेत तिन महिन्यांतुन मला वाटतं तिनच वेळा आलेले असतील. एक दिवस येतात आणि साधारण 15 दिवस दिसत नाहीत .परंतु ते संध्याकाळी गायब असतात. या सर्व प्रक्रीयेमध्ये आणि त्यांच्या कामाच्या पध्दतीमुळे प्रशासनालाही खुप मोठया प्रमाणात त्रास सहन मागच्या तिन महिन्यामध्ये करावा लागलेला आहे. म्हणजे याच्यामुळे काय आहे सर्व काही यंत्रणा त्यांच्याजवळ आहे मात्र सर्व काही आमच्याजवळ आहे. आम्ही जेवढी वाहने त्यांना मागे दिली आहेत .त्याचं त्यांनी लेखी कमीटमेंट पण दिलेले आहे. पण त्याच्यामध्ये काही प्रगती झालेली नाही. आज ते कमीटमेंट करतात तोंडी करतात लेखी करतात पण परंतु **दुसऱ्या दिवशी** ते देत नाहीत आणि हे सर्व काम सुरू झालेलं

असतांना करारनाम्यातील अटी शर्तीप्रमाणे त्याने पुर्तता करणे बंधनकारक होत. या नंतर ते सादर केल्यानंतर आम्ही त्याची तपासणी केली . वॉर्डमधील मुख्य आरोग्य निरिक्षकांचा त्याच्यावर अभिप्राय घेतला , करारातील अटी शर्ती तपासल्या जे बिल त्याला देय होते त्याबाबत आम्ही निर्णय घेतलेला आहे.आणि ज्या निर्णयाच्या बाबत क्लीरीफीकेशन आवश्यक आहे . त्याच्याबाबत आम्ही मात्र सुनावणी घेवुन निर्णय घेणार आहेत. आणि सभापती महोदयांनी जो काही मुद्दा उपस्थित केला त्यात आम्ही त्या सुनावणी मध्ये जो काही निर्णय हाईल किंवा सुनावणी साठी आवश्यक असेल ती बाजु सुध्दा आम्ही विचार करून तो निर्णय घेणार आहोत. तो जर का आम्ही त्या टिप्पणी मध्ये माफ केलेला नाही .त्या विषयाचं आम्ही त्या टिप्पणी मध्ये नमुद केलेलं आहे. आता दुसरा असा मुद्दा आहे की वॉर्ड स्तरावर आम्ही सी.एस.आय ची नेमणुक केलेली आहे. वजनकाटयावर मी स्वत: सुध्दा व्हिजीट केलेली आहे. प्लस मी शहरात ज्या ठिकाणी ते फिरतात त्या ठिकाणी मी तपासणी केलेली आहे. तरी काही ठिकाणी जास्त वजनाचा कचरा जातो .अशा ज्या काही तक्रारी आहेत त्यामध्ये मला मागच्या 12 दिवसांमध्ये मला टिपर बाबत कंम्पलेंट आलेली होती की क्षमतेपेक्षा वजन जास्त भरलेले दिसत आहेत. तर तिथे प्रत्येक मुख्य आरोग्य निरीक्षकाच्या नियंत्रणाखाली एक / एक टिपर देण्यात आलेलं आहे. त्याच्यामध्ये कुठला कचरा भरायचा कुठला नाही भरायचा किंवा किती भरायचा याचे संपुर्ण नियंत्रण त्या मुख्य आरोग्य निरीक्षकाकडे देण्यात आलेले आहे. त्यांच्या काही त्रुटी होत्या त्या त्रुटयांची पुर्तता करणे बाबत त्यांनी आपल्याला तोंडी सांगीतलेले आहे की त्या त्रुटी आम्ही दोन दिवसांत पुर्ण करून घेतो . मागच्या ३० तारखेला मा.आयुक्त साहेब यांच्या सोबत त्यांची मिटींग झाली .मिटींग नंतर त्यांनी २ दिवसांचं कमीटमेंट दिलं होतं. परंतु त्यांचा प्रतिनिधी १५ दिवसांत या शहरात फीरकला नाही .आणि जे प्रतिनिधी त्या दिवशी आले होते त्यांचे फोनही बंद होते आणि अशा परिस्थिती मध्ये त्यांचा सर्व मॅनेजमेंट सांभाळणे हे काही शक्य नाही . त्याला काही ईतके म्हणजे घंटागाडया सांभाळणे, ट्रॅक्टर सांभाळणे, कामगार सांभाळणे किंवा ईतर मॅनेजमेंट पाहणे. बिल काढतांना आम्ही त्याला कोठेही पाठीशी घातलेलं नाही. आमचा त्याच्यामध्ये वाईट हेतु त्याच्यामध्ये नाही. आणि क्षेत्रीय सी.एस.आय ची स्वाक्षरी आहे पोकळे साहेबांनी जो मुद्दा विचारलेला होता त्याच्यानंतर आरोग्याधिकारी, मी आणि नंतर वाहुळे साहेब व मा.आयुक्त अश्या सर्वांनी हा निर्णय घेतलेला आहे. आमचा त्याच्यामध्ये कोणताही वाईट हेतु नव्हता. त्या सर्व टिप्पणीचा आपण अभ्यास केला तर आपल्याही लक्षात येईल. याच्यामध्ये माझ हे म्हणण आहे मी कालच त्यांना मिटींगमध्ये सांगीतले की याच्यामध्ये १०० टक्के व्हिज्युलता आहे आणि मी आज विनंती करूनही सांगीतलं की त्यांना या ठिकाणी सभागृहात बोलविले की वस्तुस्थिती काय आहे हे त्यांना कळेल. त्यांना गावांच काय आहे हे सुध्दा त्यांना माहित नाही. की नेमका कचरा कुठे उत्पन्न होतो कचऱ्याचे नेमके ठिकाणे कोणते आहेत.ते नसल्याने आणि मॅनेजमेंट सांभाळणारा कोणताही प्रतिनिधी येथे नसल्यामुळे त्यांच्या यंत्रणेचं आजपर्यंत १०० टक्के चुकलेलं आहे. याच्यापुढे त्यांना आता जो काही दंड व्हायचा आहे त्याची अंतिम नोटीस आज किंवा उद्या मा.आयुक्त साहेबांच्या सहीने त्यांना देणार आहोत. १८ नंबर वॉर्ड मध्ये साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केला. ठेकेदाराचे अधिकारी त्या ठिकाणी काम करत होते .

**श्री.ईब्राहीम पटेल :-** आम्ही पाहीलेले आहेत .

**मा.उपायुक्त (आरोग्य) :-** हो नेमणुक दिलेली होती . पंरतु आमचे सी.एस.आय खान जे आहेत त्यांनी कर्मचारी कमी का येताहेत याचे व्हेरीफीकेशन केल्यानंतर ते कर्मचारी व तीथल्या काही लोकांना पण ते कोण आहेत ते मला माहिती नाही .परंतु त्यांनी टिप्पणी मध्ये तसा उल्लेख केलेला आहे .तर ते कर्मचारी त्याठिकाणी काम करण्यासाठी जाण्यास घाबरत होते .

**श्री.ईब्राहीम पटेल :-** नाही नाही त्याचं आम्हाला काही माहित नाही.

**मा.उपायुक्त (आरोग्य) :-** आम्ही आता 7 नोव्हेंबरला हा त्याच दिवशी निर्णय घेतलेला आहे . की तिथले जे काही ठेकेदाराचे जे लोक होते ते शेजारच्या वॉर्ड मध्ये दिले आणि शेजारच्या वॉर्डामधले १८ नंबर वॉर्डमध्ये दिलेले आहेत. आता ठेकेदारचे लोकांची शेजारच्या वॉर्डामध्ये नियुक्ती झाल्यांनंतर ठेकेदाराचे कर्मचारी

शेजारच्या वॉर्डामध्ये नियमित पणे काम करीत आहेत. म्हणजे याचा मुद्दा कसा आहे की त्यांचा त्या ठिकाणी काहीतरी वाद असल्यामुळे ते त्या ठिकाणी जावु शकत नाहीत . आता मी साहेबांशीही त्या दिवशी बोललो. आणि मला वाटते काझी साहेब ही होते काल त्यांच्याशी पण मी बोललेलो आहे. अश्या कारणाने त्यांना त्या ठिकाणी धास्ती होती म्हणुन ते त्या ठिकाणी जॉईन होत नव्हते. आता मात्र कायम कर्मचारी जॉईन झालेले आहेत.

**श्री. रियाज बागवान :-** हे आपणखोटं बोलत आहेत आपण कर्मचाऱ्यांवर विश्वास ठेवत आहेत नगरसेवकांवर आपण विश्वास ठेवुन बोलत नाहीत.

**श्री.कुलभुषण पाटील :-** महापौर महोदया , आयुक्त साहेब असे आता उपायुक्तांनी सांगीतलं की ठेकेदार या कामात कसुर आहे १०० टक्के त्याच्या कामात कसुर आहे तर हे कशा साठी आणि सभापती ताईंनी सांगीतलं हया छोटया छोटया गोष्टी सांगायच्या कशाला आता हया ज्या सर्व गोष्टी सभापतींनी १०० टक्के फेल आहे . तरीपण साहेब ईतकं मोठ बिल काढल गेल आहे. आता त्यांना प्रश्न विचारला वजनाच्या बाबतीत आपला अधिकारी हा नेहमी फेअर स्केल वर असतो तर मग आपलं काम नव्हतं का की जी गाडी तीथे कचऱ्याची भरून येते तीचं वजन किती आहे किंवा तिचे वजन किती जास्त किती लावलं गेलं आहे. त्याच्यामध्ये त्या गाडीमध्ये रेती आहे , कचरा आहे की काही आहे डबर आहे , मुरूम आहे काय आहे जर वजन एवढे **येवुच** शकत नाही ४ टन येवुच शकत नाही ते फक्त रेती , माती किंवा डबराचंच येवु शकतं . आणि यांनी आता जर यांनी सांगीतलं तर कि कंपनीचे जे प्रतिनिधी आहेत मग तुम्ही तिथे उपस्थित नव्हते का . आणि आता हा ठेका ३ महिन्यापासुन झाला आहे आणि हे आता पासुन दंडसुरू करताय. साहेब जर अधिकाऱ्यांचांच विरोध आहे तर मग कर्मचाऱ्यांचीच दुर्दशा आहे. मग हे सर्व असतांना जळगांव कर नागरीकांना वेठीस का धरायचं .हय सर्व गोष्टींची चुकीकरीता हा कॉन्ट्रक्टर जबाबदार असेल तरी हे असंच चालु राहणार आहे. या गोष्टीला ३ महिने झाले साहेब हे असे करत करत ६ महिन्यांचा कार्यकाळ असाच निघुन जाईल. साहेब महानगरपालिकेसाठी जो निधी आणला आहे साफसफाई साठी तो जर ते घेवुन जातील आणि समजा त्याचा मलदा हे अधिकारी खात असतील आणि त्याच्यासाठी एखाद्या लोकप्रतिनिधीला किंवा नगरसेवकाला जबाबदार धरलं जात असेल तर हे आम्ही कसं सहन करावं .अप्पा आमचं काही बोलणं झालेल आहे.

**ॲड. शुचिता हाडा :-** महापौर ताई मला एक विचारायचं आहे की आता दिड कोटींचा जो दंड केलेली होती आणि तो दंड आता बिल अदायगीच्या वेळेला तो २० लाखांवर आलेला आहे बरोबर आहे . नंतर त्याचं नेमकं मला स्पष्टीकरण मिळेल का . त्याला व काही आपल्या काही नगरसेवकांना पत्र सुध्दा दिले आहे . त्याला आतापर्यंत दंडाची आकारणी किती झाली काय झाली आपण त्याला दिड कोटी आकारणी केलेली होती आणि आता प्रत्यक्षात २० लाखांवर आलेली आहे . ताई मी जे बोलतेय हे खुप महत्वपुर्ण आहे हे नगरसचिवांना सांगा की हे सगळं रेकॉर्डवर आलं पाहीजे . माझ आत्ताचे जे बोलणे आहे याच्यावर सुध्दा उपायुक्त साहेब खुलासा करतील. की दिड कोटींची दंडाची आकारणी जी झालेली होती पण प्रत्यक्षात दंड लावला की नाही लावला दिड कोटींचा आणि तो २० लाखांवर कसा आला आणि काही नगरसेवकांकडे हे पत्र आहे कि किती दंड आतापर्यंत लावला गेलेला आहे. तो साधारण दिड कोटींचा दंड लावला गेलेला आहे. दिड कोटींचा २० लाखांवर कसा आला. हा खुप महत्वपुर्ण मुद्दा आहे.याचं स्पष्टीकरण हवं आहे महापौर ताई नगरसचिवांना सांगा हे रेकॉर्डवर घ्यायला

**मा.उपायुक्त (आरोग्य) :-** मा.सभापती ताईंनी जो मुद्दा येथे उपस्थित केलेला आहे. टिप्पणी मध्ये आम्ही हे सर्व क्लीअर केलेलं आहे की ,दंडाचे जे रेटस होते, बाबीं होत्या त्या कोणत्या आहेत त्या बाबींची पुर्तता त्याने न केल्यामुळे कोणता दंड आम्ही आकारलेला आहे. आणि जे काही रिपोर्टस क्षेत्रीय एस.आय व सी.एस.आययांनी दिलेले आहेत व ज्याबाबत सुनावणी घेवुन निर्णय घेणे आवश्यक आहे असे आम्ही टिप्पणी मध्ये सविस्तर नमुद केलेले आहे. आता त्याच्यात दोन बाबी आहेत. ४ ते ५ लेट चा दंड आम्ही त्याचा वसुल केलेला आहे. आणि बाकीचा जो दंड आहे त्याची सुनावणी घेवुन पुढची कार्यवाही करायची आहे. अशा दोन गोष्टी आहेत.

**ॲड. शुचिता हाडा :-** नाही सभागृहाला हे सांगा की सुनावणी आपल्याला का गरजेची आहे.आणि हे नमुद करा आणि टिप्पणीही सभागृहात वाचलेली नाहीये सगळयांना अवगत करा की कोणत्या बाबींबद्दल दंड आकारला व कोणता सुनावणी साठी राखुन ठेवला आहे.

**मा.उपायुक्त (आरोग्य) :-** दंडाच्या ज्या काही तरतुदी आहेत त्याच्यामध्ये पहिली आहे त्याच्यामध्ये घंटागाडी सकाळी ७ वाजता डंपींग च्या ठिकाणी , स्वीप लोडर , कॉम्पॅक्टर ई वाहने वेळेवर आणणे ती जर आली नाही तर त्याच्यामध्ये घंटागाडी जर आली नाही त्याला ३ हजार रू दंड आहे आणि कॉम्पॅक्टर साठी ५ हजार रू. दंड आहे. **स्कीप** लोडर साठी २ हजार रू. दंड आहे. याच्यामध्ये १६ ऑगस्ट ते ३१ ऑग**स्ट** मध्ये या कालावधीत १,३७,५०० रू. हा दंड आकारलेला आहे. १ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर या कालावधी मध्ये ८,२०,१०० रू. दंड वसुल केलेला आहे. दुसरा एक हा मुद्दा घंटागाडी , रिफ्युज कॉम्पॅक्टर आणि स्वीप लोडर याच्यावर कामगार न पुरविल्यास प्रति कामगार ५०० रू दंड ऑगस्ट महिन्यामध्ये ४५०० रू. दंड आहे. सप्टेंबर महिन्यामध्ये ५०९०० रू. हा दंड आहे.तिसरा जो मुद्दा आहे मक्तेदारने त्याच्या गाडयामध्ये कचऱ्यामध्ये गाळ किंवा माती मिश्रित करतांना आढळल्यास प्रति वाहनांवर ५००० रू. दंड आकारणी करण्यात येईल. आता आम्हाला असे आढळले आहे त्या कालावधीत आम्ही त्याला दंडाची आकारणी केलेली आहे. परंतु या दोन महिन्यात **दंडाची आकारणी** क्षेत्रिय स्तरावर करण्यात आलेली नाही.

**ॲड . शुचिता हाडा :-** मला हे सांगा याची आकारणी का नाही झाली.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** आता याचे उत्तर सांगा मला.

**मा.उपायुक्त (आरोग्य) :-** हा विषय सप्टेंबर पर्यंतचा आहे .हे जर ऑक्टोंबर किंवा नोंव्हेंबर चे असते

**ॲड. शुचिता हाडा :-** आता हे सांगा की गाळ किंवा माती मिश्रित करतांना आढळुन आल्यास ५००० हजार रू दंड हा आकारण्यात येईल. आणि त्याच्याबद्दल आपण याच्यामध्ये **एक्सप्लेन** दिलेलं आहे की संबंधित आरोग्य निरीक्षक यांनी आकारणी केल्याची नस्ती सोबत आली आहे परंतु रकाना क्रं. ३२ मध्ये परंतु समक्ष प्रधिकाऱ्यांचे अभिप्राय घेणे आवश्यक आहे . आपल्यापेक्षा कोण सक्षम **प्रा**धिकारी आहेत आपण एक खास नियुक्त केलेले उपायुक्त म्हणुन काम पाहात आहात या कामासाठी आज पर्यंत जळगांव मध्ये पण माझ्यामाहिती प्रमाणे नव्हते मग अजुन कोणत्या ठिकाणी वेगवेगळी काय चौकशी करणार म्हणजे हे राखुन का ठेवलयं काय कळलं नाही.

**मा.उपायुक्त (आरोग्य) :-** नाही याच्यामध्ये माझ्या माहिती प्रमाणे नोव्हेंबर महिन्यामध्ये ५ तारखेला आरोग्याधिकारी यांनी त्याला ५००० दंड लावलेला आहे. त्याच्यानंतर सन्मा.सदस्यांनी आज आम्हाला मोबाईल वर दाखवलेले आहे.

**ॲड. शुचिता हाडा :-** याच्यात असे लिहीलेलेच आहे की फेरविचार करून आकारणी करण्यात येईल ती काय आहे. मग हा विषय राखुन का ठेवला आहे. सक्षम प्राधिकारी यांचा अभिप्राय घेवुन नंतर आकारणी करण्यात येईल . सक्षम प्राधिकारी म्हणजे कोण ? आपण उपायुक्त आहात आपण स्वत: या कामाचं बघता आहात फक्त एकच काम आपण प्रायोरिटीने करता आहात माझ्या माहिती प्रमाणे आपणच सक्षम प्राधिकारी आहात आणि मग अजुन कोण आहे की ज्याच्यासमोर सुनावणी होण अपेक्षित आहे .

**मा.उपायुक्त (आरोग्य) :-** मॅडम याच्यामध्ये ऑगष्ट आणि सप्टेंबर महिन्याचे अशी कोणत्याही प्रकारची बाब आढळुन आली नाही . घंटागाडी ची जी एक तक्रार आली होती त्याचा ५ हजार रू दंड केलेला आहे .

**श्री.अमर जैन :-** साहेब जेव्हा तक्रार येईल तेव्हाचं तुम्ही दंड करणार का तुमचे एस.आय फीरत नाही का या त्या ताईंचे म्हणणे निट ऐका तुम्ही उत्तर असे देता आहेत की नोंव्हेंबर महिन्यात तक्रार आली त्याच्या पहिले तक्रारी येत होत्या पण तुम्ही लक्ष देत नव्हते .

**मा.उपायुक्त (आरोग्य) :-** नाही नाही असेनाहीये आमचे एस.आय शहरात फीरतात

**श्री.अमर जैन :-** साहेब तुम्ही पहिले तो विषय समजुन घ्या . आताच एका बी.जे.पी च्या जबाबदार नगरसेवकाने हा आरोप केलेला आहे प्रशासनावर की म्हणणे काय आहे .

**ॲड. शुचिता हाडा :-** माझा प्रश्न एकदम सोपा आहे की दिड कोटींचा दंड आकारला होता तो २० लाखांवर कसा काय आला. आपण याचे सोपे उत्तर द्या काय आहे परत परत आकडेवारी आमच्या सर्वांच्या लक्षात येत नाही. कारण आकडेमोड ही सगळयांना कंटाळवाणी होते याच्यातुन सगळयांचे लक्ष विचलीत होते म्हणुन मग हे सगळ विसरून जातो . तुम्ही फक्त हे उत्तर दिलं तरी चालेल की दिड कोटींचा दंड २० लाखांवर कसा आला.

**मा.उपायुक्त (आरोग्य) :-** मगाशीच मी सांगीतलं की आम्ही त्याला पाच ते सहा बाबतीत दंड आकारलेला आहे आणि तुम्ही असेही विचारले की कोणकोणते दंड असे आहेत की निर्णय न देता तुम्ही राखुन ठेवलेला आहे. किंवा वसुल केलेला आहे .

**ॲड. शुचिता हाडा :-** हो ना मग वसुल केलेला आहे ते दिसतयं आणि मग जो राखुन ठेवला आहे त्याला राखुन ठेवण्याचे कारण काय ? आता प्रत्येक अडचणी कश्या आहे ते समजावुन सांगा फक्त आणि याच्यामुळे त्या राखुन ठेवलेल्या आहेत.

**सौ.ज्योती चव्हाण :-** काय अडचणी आहेत ते सांगुन टाका एकदा म्हणजे क्लीअर होईल.

**श्री.कैलास सोनवणे :-** दिड कोटी कसे केले आहे साहेब तुम्ही नियमाने केले आहे का ?

**मा.उपायुक्त (आरोग्य) :-** आम्ही जे निर्णय घेतलेला आहेत तो करारनाम्यातील अटी शर्ती प्रमाणेच आम्ही घेतलेला आहे.ज्या बाबींसदर्भात निर्णय घेणे आवश्यक होते त्या संदर्भात सुनावणी घेवुन मग तो निर्णय घेणार आहोत. त्या सदर्भात त्या ठेकेदाराला ३० तारखेला बोलावले ही होते पण त्याच्यानंतर तो आल्यानंतर सुनावणीसाठी थांबला नाही मग १४ / पंधरा दिवस तो आलेला नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** सुनावणीसाठी नोटीस दिली आहे का त्याला

**मा.उपायुक्त (आरोग्य) :-** होय दिली आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** म्हणजे दिड कोटीचा विषयचं झालेला नाही अजुन

**ॲड. शुचिता हाडा :-** त्याला सुनावणी साठी बोलावले पण तो आला नाही अशी प्रशासनाकडुन माहिती मिळतेय मग आता सुनावणी साठी बोलावुन तो येत नाही तर आता आपण त्याच्यावर काय करणार आहेत का ? का लावत नाही दंड ? आपण जर नियमाने लावु शकतो तर आपण का लावत नाहीये ? कोणत्या सेक्शन नुसार कार्यवाही करायची आहे ?

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौर साहेब , आयुक्त साहेब यांचा जो दिड कोटींचा जो विषय आहे ना आरोग्याधिकारी यांना ५ लाख रू दिले आहे मक्तेदाराने बिग बाजार येथे दिड ते अडीच महिन्याआधी आरोग्याधिकारी डॉ.विकास पाटील यांना.

**मा.उपायुक्त (आरोग्य) :-** किती गंभीर आरोप करीत आहेत .

**श्री.प्रशांत नाईक :-** आरोग्यसभापती चेतन भाऊला माहित आहे .

**श्री.चेतन सनकत :-** मा.महापौर **मॅडम हा विषय जो आहे**, माझ्यापर्यंत माहिती आली आहे ती मी उपायुक्त साहेबांना दिलेली आहे. उदय पाटील यांनी **बिग बाजाराच्या रोडवर** ५ लाख रूपये घेतलेले आहे खांमगांवचे अक्रम म्हणुन यांचे प्रतिनिधी आहे त्याच्याकडुन मी उपायुक्तांना कल्पना दिलेली आहे या गोष्टीची **बिल काढण्यासंदर्भात.**

**ॲड . शुचिता हाडा :-** माझा विषय हा नाही माझा विषय हा आहे की .

**श्री.चेतन सनकत :-** आरोग्य समितीच्या सदस्याकरीता तुम्ही शिवसेनेकडुन पाठवा दोन वेळा बैठक झालेली आहे. त्याबाबतीत त्या बैठक मध्ये काय घडतं तुम्हाला समजत नाही तुम्ही शिवसेने पाठवा , एम.आय.एमचेही पाठवा हि समिती गठीत करतांना तुम्हाला पत्र दिले होते तुम्ही सदस्य पाठविले नाही .

**श्री.कैलास सोनवणे :-** आता या ठिकाणी काही प्रश्न अनुत्तरीत राहीलेले आहेत.वेगवेगळया चर्चा यायला लागल्या तर तुम्ही ताईंच्या शंकेचे निरसण करून द्या हा एक विषय आहे त्यानंतर ठेकेदाराचे प्रतिनिधी ईथे आलेले आहे त्यांना रोज काय देतो आपण तुम्ही ते टाईमावर देतात .

श्री.**शंतनू बोरसे , प्रतिनिधी (वॉटर ग्रेस) :-** आपण त्यांचे अकाऊंट ओपन झाले की त्यांचा पी.एफ लागु होईल

**ॲड . शुचिता हाडा :-** अकाऊंट ओपन झाले आहेत का

**श्री.कैलास सोनवणे :-** खोट बोलताहेत ते .मा.महापौर साहेब परवा जे आले होते भंडारी ते तुमच्या वर आहेत की खालचे आहेत.

**शंतनू बोरसे , प्रतिनिधी (वॉटर ग्रेस) :-** ते आमचे कॉन्ट्रक्टर आहेत त्यांचे भाऊ आहेत. त्यांचा जो नियमानुसार किमान वेतन आहे .

**श्री.कैलास सोनवणे :-** त्या दिवशी तिथे सांगीतले आहे त्या ठिकाणी महापौर होते , उपमहापौर होते , मी होता , आयुक्त होते , दंडवते साहेब होते , विरोधी पक्ष नेते होते हे सर्व् लोक होते .

**शंतनू बोरसे , प्रतिनिधी (वॉटर ग्रेस) :-** सदर आपण त्यांना किमान वेतन देत आहोत.

**श्री.कैलास सोनवणे :-** देत नाहीये तुम्ही आणि ३१ तारखेला ३१ ऑगस्टला आंदोलन केलं होत त्यांनी

**ॲड . शुचिता हाडा :-** आतापर्यंत किती लोकांचे अकाऊंट ओपन केले आहेत .

**शंतनू बोरसे , प्रतिनिधी (वॉटर ग्रेस) :-** मी आता त्यांना भेटलो काहींनी ओपन केले आहे

**ॲड . शुचिता हाडा :-** मी आयुक्त साहेबांना विचारू ईच्छिते की किती वेळ लागतो हे अकाऊंट ओपन करायला किती वेळ लागतो या सगळयांसाठी आता ३ महिन्यांचा कालावधी झालेला आहे. आणि यांच अजुन हेच चालु आहे होतयं झालयं खरंतर आपल्याला वाहुळे साहेब मार्गदर्शन करू शकता कारण होतय झालय असे पुरे आहे.

**मा.मुख्यलेखाधिकारी :-** मा.महापौर , मा.आयुक्त सो तसेच मा.सभागृह कोणत्याही व्यक्तीचे अकाऊंट ओपन करायचे असेल तर त्यासाठी फक्त केवायसी डॉक्युमेंट त्याच्यामध्ये आधार कार्ड , पॅन कार्ड याच्या पैकी कोणतेही एक डॉक्युमेंट सादर केले तर एका दिवसामध्ये अकाऊंट ओपन होवु शकतं.

**ॲड . शुचिता हाडा :-** एका दिवसात होवु शकतं पण यांच अजुन ते चालुच आहे . तर म्हणजे आता म्हणताहेत की देत नाहीये जर त्यांचे आधार कार्ड देत नाहीये किंवा ईतर काही देत नाहीये तर दुसऱ्या कोणाला तरी लावा . याच्या मध्ये एक मुद्दा माझा सांगायचा राहीला की यापुर्वी आपण एका पत्रात असे म्हटंलेलं आहे की जळगांवात आम्हाला कामगार मिळत नाहीये . असं होवु शकतं का म्हणजे यापुर्वीचे ठेकेदार जळगांवातलेचं कामगारांकडुन काम चालवतं होते . मिळत होते कामगार आजही जळगांव मध्ये रोजगार नाही जळगांव ही उद्योग नगरी नाही यांनी यांच्या पत्रात असे नमुद केलेले आहे की ,जळगांवात म्हणजे मुळात सफाई कर्मचारी हा ग्रामीण भागातुन येतो तो ईथं आल्यानंतर त्याला दुसरं काम मिळत व तो सोडुन दिल्यामुळे आम्हाला पुरेशे कर्मचारी उपलब्ध होतं नाही . आम्ही बाहेरून मजुर आणुन पुरेशे कामगार पुरविणार आहोत. या म्हणजे यांनी जो खुलासा केलेला आहे. त्यात काहीच म्हणजे अजिबात तथ्यच नाहीये म्हणजे जळगांवात पुरेशे मनुष्यबळ उपलब्ध नाही .जळगावांत यास्तरावर जो काम करतो त्या स्तरावरील कुठलेही रोजगार उपलब्ध नाही. आणि मला वाटतं नाही की याच्यामुळे आम्हाला आधार कार्ड दिले नाही कर्मचाऱ्यांनी आम्हाला डॉक्युमेंट लवकर पुरवले नाहीत म्हणुन त्या सर्व प्रोसिजरला वेळ लागला .यांनी जे ईन्टरव्हयु घेतले होते कर्मचाऱ्यांचे अपॉईटमेंट साठी त्या ईन्टरव्हयु लाच यांनी हे डॉक्युमेंट मागविलेले होते. ज्या कर्मचाऱ्यांजवळ डॉक्युमेंट नाहीत त्यांना ईन्टरव्हयुला सुध्दा उभं केलेलं नाही .त्यांनतर तिन महिने झाले यांचे अकाऊंट का ओपन होतं नाहीये .आपले कॅफो साहेब सांगाताहेत की फक्त एक दिवस लागतो २४ तास लागतील जर हे डॉक्युमेंट असतील तर ही प्रोसिजर कंम्पलीट करायला .तीन महिने ९० दिवस झाले तरी यांच होतं नाहीये . ३२ नंबर चा जो कॉलम आहे

की जर या सगळया गोष्टी राहात असतील तर यासाठी त्यांना दंड लागु करा .आणि आपण कचरा पडलायपडु द्या कस करायचं स्थगित ठेवता येईल ते बघा . उपायुक्त साहेबांनी मला स्पष्ट उत्तर द्यावं . की दिड कोटींचा २२ लाखांवर कसा आला ? आणि स्थगित जे ठेवलेलं आहे आपण ते कोणत्या सक्षम अधिकाऱ्यासमोर आपण ही सुनावणी घेणार आहात. ३० तारखेला त्याला सुनावणीला बोलावलं तो आता नाही . मग आता काय त्याला दुसरं पत्र देणार का ? की निमंत्रण देणार आहेत का आपण त्याच्या कडे की या आपली सुनावणी घेणार आहोत . तो दंड आपण का आकारतं नाहीये . कमीची रक्कम सांगा . नगरसेवकांच्या पत्रातुन दिसतयं की आपण दिड कोटींचा दंड लावला आहे.आणि हि जी आकारणी झालेली आहे ती फक्त साधारण २० लाखांच्या आसपासं झालेली आहे . तरी एवढी प्रचंड तफावत प्रशासनाबद्दल शंका निर्माण करते.

**मा.उपायुक्त (आरोग्य) :-** त्याला जे काही बिल दिलेलं आहे ते ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्याचे २५ लाख ९८८ रू. हे त्यांना त्याच्या कामांच्या त्रुटी बाबत हा दंड आहे. आणि आपली यंत्रणा जी लावली होती त्याचा ही काही दंड आहे आणि त्याचा दंड आहे तो २७ लाख ८० हजार पर्यंत आहे. मी मगाशी सांगीतल्याप्रमाणे की , त्यांची हिअरींग घ्यायची आहे हिअरींग साठी त्यांचा कुणी सक्षम माणुस ३० तारखेला आलेला नव्हता . आणि ते हिअरींग ला थांबलेले नाही .हि वस्तुस्थिती आहे. त्याच्यानंतर आम्ही त्यांना फोनवर सुचना दिली की , तुम्ही सक्षम माणुस पाठवा . आता याच्या मध्ये काही बाबी अ**श्या** आहेत की , याबाबत त्यांनी आपल्याकडे कधीचं पत्र व्यवहार केलेला नाही. किंवा त्यांची कोणतीही गोष्ट आपल्याकडे उपलब्ध नाही. त्याचं एकच पत्र येत असतं आपल्या ऑफीसला कोणत्याही प्रकारे आम्ही जे काही त्यांच्याकडे मागणी केलेली आहे . म्हणजे जे काही त्यांनी द्यायला पाहीजे आपल्याला वेळोवेळी त्या पत्रव्यवहारा द्वारे त्यांनी मांडलेलं नाही. आणि त्याची सुध्दा हिअरींग आपल्याला घेता आली असती . मला वाटलं की त्यांचा सक्षम प्रतिनिधी या ठिकाणी असल्यानंतर हि हिअरींग होईल . आणि ती आपल्याला अचुक पणे घेता येईल. आता त्यांचे वॉटरग्रेस चे बॉस काल या ठिकाणी आलेले आहेत. त्यांना मी सांगीतले की तुम्ही लेखी पत्रासह या ठिकाणी हिअरींग साठी उपस्थित राहायचे आहे.

**श्री.धिरज सोनवणे :-** आता मला या ठिकाणी एक विचारायचे आहे की वॉटर ग्रेस च्या कर्मचाऱ्यांना किमान वेतन द्यायचे आहे ते जे ठरवले आहे त्याच्यावर आपले पण काही नियंत्रण आहे का . त्याचं म्हणणं असं आहे की आम्ही कर्मचाऱ्यांना वेतन देतो आणि डायरेक्ट वेतन ठरल्याप्रमाणे देतो .परवा आमदार साहेब , मी , विकास पाटील माझ्या वॉर्डात उभे होते सकाळी एक आपली महापालिकेची घंटागाडी चालली होती त्या घंटागाडीला बाहेरून अशा वेगवेगळया पिशव्या टांगलेल्या होत्या. आमदारांनी विचारले की हा कायप्रकार आहे. की ही पिशवी का टांगलेली असते मी त्या कर्मचाऱ्याला जेव्हा विचारले की तो म्हणाला की आमचे पेंमेंट मिळत नाही कचऱ्यातुन जे लोखंड, प्लास्टीक जे निघतं तो विकतो व आमचा खर्च भागवतो म्हणजे आप**ल्या** वाहनांचे विद्रुपीकरण पण होतय आणि यांचे असे म्हणणे आहे की त्यांना पगार दिला जातोय .हे खोटं सांगताहेत. आणि ते जर काम करताहेत तर त्यांना त्यांचा रोजगार का नाही मिळावा . त्याच्यावर आपलं काय नियंत्रण आहे **याचा** काहीतरी खुलासा करावा.

**श्री.कुलभुषण पाटील :-** हे म्हणताहेत की त्यांचा पगार होतोय माझ्या वॉर्डातील कर्मचारी सुध्दा बोललेला आहे मला माझ्या वॉर्डात का सांगतोय की मी स्वत: पाहीलेलं आहे. त्याला तिन महिने झाले पगार दिला नाही त्याला तिन महिन्यात फक्त १० रू दिलेले आहेत साहेब मला सांगा तो तिन महिने ते काय करणार आहे . साहेब हे **म्हण**ताहेत की हे त्यांना पगार देताय

**श्री.धिरज सोनवणे :-** आताही आयुक्त साहेब आताही तुम्ही चेक करा आपल्या ज्या घंटागाडया फिरताहेत त्यांना त्या पिशव्या टांगलेल्या दिसतील . त्या वाहनांचानंबर सुध्दा दिसतं नाही आणि सर्व वाहनांवर लावुन ठेवलेल्या आहेत.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** मा.आयुक्त साहेब माझा एक विषय आहे .

**श्री.कैलास सोनवणे :-** आता या सगळया सभागृहामध्ये सर्व सदस्यांच्या संतप्त भावना आहे . की प्रश्नांचे उत्तर मिळाले काहींचे बाकी आहेत . तुम्ही उपायुक्त साहेब शुचिता ताईंच्या त्या तुम्ही निराकरण करून द्या .आपण या ठिकाणी असे गृहीत धरून घेतोय आणि आहेच तस आहे की तक्तेदाराची चुक झालेली आहे . त्याला संधी देवुन सुध्दा त्याने सुधारणा केलेली नाहीये .फक्त मी आयुक्त साहेबांना विचारेल की त्याला आपल्याला काय नडतय हा ठेका रद्द करण्याच्या दृष्टीने तर त्याला काय संधी द्यायला पाहीजे का द्यायला पाहीजे. किंवा तो जेणेकरून कोर्टात जाईल व आपल्या महापालिकेला त्रास होईल .तर त्याच्यासाठी कसा ठराव मांडायचा म्हणजे काय मागच्या मिटींग मध्ये एक महिन्याची की हा ठेका रद्द करावा व त्यादृष्टीने पाऊले उचलावी . पुढेही असा मक्ता काढावा कोणाचीही एकाची **मोनोपॉली** राहणार नाही .तुम्ही तुमचं बिस्तारा आवरा तुम्ही जी जळगांव करांची जी घाण केलेली आहे ना . आवरून घ्या. काही लोकांना त्रासपण झालेला आहे. तर कायकरायला पाहीजे म्हणजे सगळया गोष्टींची पुर्तता करून म्हणजे आपल्याला काही बाधा येणार नाही. त्या दृष्टीने तुम्ही ईथे सांगा व तो ठराव आपण येथे मंजुर करून घेवु .

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** मा.आयुक्त साहेब , महापौर साहेब , उपमहापौर साहेब करारानाम्याच्या आपण हि जी वाहने आहेत त्याच्यात जीपीएस प्रणाली पाहीजे . व आरटीजीएस प्रमाणे कर्मचाऱ्यांचे पेमेंट पण दिले गेले पाहीजे. यानंतर आपण सक्षम अधिकारी म्हणुन आदेश दिलेले आहात. मक्तेदाराचे घनकचरा व्यवस्थानाचे काम समाधानकारक नसल्यास प्रामाणित करुन ते बिल अदा करणे. याचा अर्थ असा की, आपले उपायुक्त समाधानी आहेत का त्या कामाने. समाधानी नसला तरी त्याचा बिल अदा केलेला आहे. नियमात नसतांना तरी ही त्याचे बिलाचे आर.टी.जी.एस. ने पेमेंट केलेले आहे. हा महत्वाचा विषय आहे. आता वस्तुस्थिती अशी आहे. कुठेही कर्मचारी फीरतोय कुठे कचरा पडलेला आहे. माझा एक अनुभव असा आहे मी भोईटे नगर मध्ये वाहनातुन जात असतांना जो मक्तेदाराचा जो कर्मचारी होता साफसफाई साठी तो एका चहाच्या टपरीवर कपबश्या धुत होता . अटेंडंस तिथे लागली होती .याचा अर्थ आपलं प्रशासन कुठेतरी गोलमालीत आहे.आणि आमचा सक्त आरोप आहे की तुमच्या मुळे आमची प्रतिमा खराब होते आहे . आपण जर तातडीने निर्णय नाही घेतला तर नगरसेवकांसोबत आम्ही लेखी स्वरूपात घेवु त्याची कारवाई तुम्हाला करावी लागेल .कारण काय आहे की अधिकारी कुठल्याही परिस्थितीत कार्यवाही झालेली नाही. कोणत्याही पत्राचे उत्तर मिळालेल नाही. पाणी पुरवठा असेल तर लोकांना कनेक्शन घ्याचे असतात लोकं वार्ड ऑफिसला जातात. नविन उपायुक्त साहेबांनी नविन नियम काढलेला आहे. जो पर्यंत माझी टिपणी लागत नाही तो पर्यंत नळ कनेक्शन देऊ नका. जो व्यक्ती घरपट्टी भरतो, पाणीपट्टी भरतो, चार्जेस भरतो तो त्या पाणी कनेक्शनसाठी ३-३ व ४-४ दिवस थांबेल का ? तो चुकीचा कनेक्शन घ्यायला येत आहे का ? मा.महापौर साहेबा आम्हाला हा आदेश तात्काळ स्थगित करुन स्थानिक स्तरावर नागरीकांना पाणी कनेक्शन मिळायला पाहिजे. २४ तासाच्या आत मिळायला पाहिजे.

**श्री.सचिन पाटील :-** तुम्ही महानगरपालिकेचा महसुल बुडविता आहे साहेब. आठ आठ दिवस सहया होत नाही.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** प्रभाग अधिकारी फिरत राहतो उपायुक्तांच्या मागे.

**मा.आयुक्त :-** गेल्या आठ दहा दिवसापासुन आरोग्याच्या ठेक्याच्या संदर्भात ज्या काही सर्व नागरीकांच्या सन्मा.सदस्यांच्या ज्या भावना आहेत त्या अतिशय तीव्र आहेत . आणि एकंदर वस्तुस्थिती पाहता ठेकेदारचे काम हे समाधानकारक नाहीये. आपल्या ज्या ठेक्याचे अटी शर्ती आहेत . यासंदर्भात एक दोन दिवसांपुर्वी सन्मा.आमदार साहेब काही सन्मा. नगरसेवक यांची एक संपुर्ण चर्चा झाली. आणि या मध्ये ही सर्व वस्तुस्थिती पाहाता आपण एक महिन्याची मुदत त्याला संबंधित यंत्रणेला देवु या . त्यानंतर आपण ठेका रद्द करण्याची कार्यवाही आपण सुरू करूया. आणि दुसरा विषय जो होता की हा दंड कसा केला का केला तर तो काही प्रश्न आपण उपस्थित करताहेत . तर त्या संदर्भात जे काही निर्णयघ्यायचे आहेत तर ते आपले जे उपायुक्त आहेत त्यांनी हिअरींग घेवुन त्वरीत त्याचा निर्णय घ्यावा आणि त्याप्रमाणे आपण पुढील कार्यवाही करावी.

**ॲड . शुचिता हाडा :-** माझे काही प्रश्न अनुत्तरीत राहीलेले आहेत तर त्यांचे उत्तर मला मिळालेले नाहीयेत त्याची पण नोंद घ्यावी . आणि त्याची उत्तर मिळावी . ईथे सक्षम अधिकारी असतांना सुध्दा त्याच्या बिलाची जी काही ऍडजस्टमेंट करण्यात आलेली आहे. एक प्रचिती ही असतांना सुध्दा . . .

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आपल्या अमृत योजना आणि एलईडी संदर्भात जो प्रस्ताव होता तोही तुम्ही लवकरात लवकर मार्गी लावा.

**सौ.पार्वताबाई भिल :-** मा.सभापती ताईंनी जे मांडले आहे ते सभापती जे झाले आहेत ते योग्य झाले आहेत. माझ्या म्हणण्याप्रमाणे हा ठेका रद्द च व्हायला पाहीजे. हाठेका रद्द व्हायला पाहीजेल त्यांना आता कळाले की आता महासभा आहे आपली सभेमध्ये ओरड होईल म्हणुन त्यांनी वॉर्डामध्ये माणसे व घंटागाडया लावलेल्या आहेत . नाहीतर त्याच्या आधी सहा दिवसांतुन एकदा फक्त पाचच मिनिटे येते . आणि त्याला ५ लिटर डिझेल दिले जाते म्हणजे ते काय आहे थोडं थोड थोडं फीरवतात व तिथल्या तिथे गोलमाल करतात. नागरीक लोकं थोडं थोड मांडता आणि नगरसेवकांना धरता हेच माझं मांडणं आहे महापौरताई.

**आरोग्याधिकारी :-** तुम्ही जो प्रश्न केलेला आहे ते विचारुन घ्या मक्तेदार समोर आहे.

**शंतनू बोरसे , प्रतिनिधी (वॉटर ग्रेस) :-** मॅडम जे तुम्ही म्हणत आहे ते बरोबर आहे. जे घंटागाडया आहे त्यांचे डिझल पॅक करुन दिलेले असतात.जर ते माझ्याकडे दोन तीन तासात गाडी घेऊन आले तर मी काय करु मॅडम.

**सौ.पार्वताबाई भिल :-** दुसरा मुद्दा त्या ट्रॅक्टरवर एक ड्रायव्हर राहात नाही. ड्रायव्हर आहे न त्या ड्रायव्हर १५ दिवसांत ८ दिवसांत ड्रायव्हर बदलत असतो त्यामुळे त्यात माहिती नसलेला पहिला ड्रायव्हर राहतो त्याला माहिती असते .

**श्री.प्रविण कोल्हे :-** जे सैनिक व माजी सैनिक आहे. त्यांना मागे घरपट्टी माफ केली होती. तर या लोकांना का फिरविले जाते, व्यवस्थीत माहिती दिली जात नाही.ते आपल्यासाठी सिमेवर लढतात आणि त्यांना आपल्याकडे फिरविले जात आहे. हे चुकीचे आहे. त्यांना फिराफिर होऊ नये. आणि त्याचा जे आदेश आहे त्यासाठी खुप मोठी प्रोसेस आहे.

**मा.आयुक्त :-** आपल्याकडे जर प्रकरण आहे आम्हाला द्या आम्ही तपासुन घेऊ.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** जे घंटागाडयांच्या प्रभाग निहाय ज्या नियुक्त्या झाल्या त्यांना त्यांची चतुरसिमा ठरवुन द्यावे. त्यांना हे ३ लिटर मध्ये दोन ट्रिपा मारायला सांगता. ते होत नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** आयुक्त साहेब आपण जी काही चर्चा केली आता त्यामध्ये आपण त्यांना काही बोलण्याची संधी काही दिलेली नाहीये आता हया त्रुटी आम्ही मांडल्या व तुम्ही जेवढया ऐकल्या त्या का राहील्या तुमचं म्हणणं मांडा तुम्ही आता

**ॲड . शुचिता हाडा :-** आता आपली ज्यावेळेला चर्चा सुरु होती त्यावेळेला लक्ष नव्हत ते बोलले ईथे उभे राहुन मी ऐकले ते ईथे त्यांनी सांगीतले की आम्ही सुरूवातीला आमच्या ड्रायव्हरच्या ताब्यात १५ / १५ लिटर डिझल भरून घंटागाडया ताब्यामध्ये दिल्या आणि त्याच्यानंतर डिझल ची चोरी झाली तर हा ठेकेदाराचा विषय असतो. त्यासाठी सिक्युरीटी नेमणे ही त्यांची जबाबदारी असते . त्यामुळे असेच स्पष्टीकरण जर ते देत असतील तर त्यांचे मुद्दे म्हणजे आपण त्यांच टेंडर रद्द करण्यासाठी किंवा त्यांना सांभाळण्यासाठी या मुद्दयांचा वापर होवु नये हे अशा पध्दतीचे खुलासे त्यांच्याकडुन केले जाताहेत .आणि या गाडया सगळया गाडया आपल्या आहेत . यासगळया गाडया तिथे पार्कीग करतो आहे हा ठेकेदार तिथे सिक्युरीटी आपली वापरली जाते आहे . माझ्या माहिती प्रमाणे मनपा तेथे सिक्युरीटी ठेवते. गाडया आपल्या आहे त्याची जबाबदारी आपली आहे. त्या सांभाळणं आपल काम आहे. मग ती ठेकेदाराची जबाबदारी नाही का मग आपण त्यांच्यावर कोणतेही भाडे आकारत नाहीये तो आज आपल्या गाडया वापरतोय जरी तो आपल्या अग्रीमेंटचा क्लॉज असला तरी व आपली जागा वापरत असला तरी ही त्याची जबाबदारी आहे. बर याच्या अनेक गोष्टींवर पर्याय निघु शकतात. ते काय म्हणत आहे. डिझेल चोरीला जात आहे. त्यांनी त्यांची प्रावेसी दुसऱ्या युनिटला अपॉईंट

करावी. तुम्ही ठेका घेतांना हे सर्व गोष्टी क्लियर असतात की आपल्याला उपयोगी काय काय खर्च करावा लागणार आहे. आणि वीथ मार्जीन आपण ती रक्कम नोट केलेले असतात. जर असे खुलासे मिळतील आणि असे खुलासे देण्यासाठी जर त्यांचा प्रतिनिधी येत असेल, तो खुलासे देईल आणि मग आपण त्या त्या क्लॅजेस वर खुलासे घेऊन ती दंडाची रक्कम ठरवु. तर अश्या खुलास्यांसाठी थांबु नका. जर त्यांचा प्रतिनिधीच येथे हजर राहत नाही. तर आपण एकतर्फी सुनावणी करु शकता की आपण त्यांचा प्रतिनिधी आलेला नाही. यांचा प्रतिनिधीच नाही. मग आपण जे बिलातले सगळे क्लॅज चेंज केलेले आहे. ही जी टिप्पणी आपण केली. ही कशाच्या आधारावर केली. माझा जो प्रश्न आहे की दिड कोटीची जी रक्कम दिसत होती ती २० लाखावर कशी आली. याच उत्तर द्यावं याच उत्तर अजुनही मला उपायुक्तांकडुन मिळत नाही. त्यांनी दोन चार जे मुद्दे असतील ते तुम्हाला कळले असतील तर ते पण मला समजुन सांगावे. कारण मला तरी लक्षात आलेला नाही. दिड कोटींच २० लाखांवर कसे आले.

**मा.आयुक्त :-** यासंदर्भात ठेकेदाराच्या त्रुटी आपल्या अशा झालेल्या आहेत . ते कारणं आहेत आम्ही जरी ऍक्शन घेत नाही तरी त्याची सर्वस्वी जबाबदारी तुमच्याकडे आहे . ज्या कारणा साठी आम्ही हा ठेका दिला तेच कारण किंवा त्याच्या वरील पध्दतीने महानगरपालिकेपेक्षा वरील पध्दतीने वरील जर का काम होणार असेल तर त्या ठेक्याची महानगरपालिकेला काही आवश्यकता नाही.तर हे एक महिन्यामध्ये जर नाही झालं . पुन्हा आपल्याला सगळयांना एकत्र घेवुन आपल्याला या विषयावर निर्णय घ्यावा लागेल.तर पुढील एक महिन्यामध्ये तुम्ही कश्याप्रकारे नियोजन करणार आहात. या संदर्भात आपण सांगा .

**शंतनू बोरसे , प्रतिनिधी (वॉटर ग्रेस) :-** मा.सभापती साहेब , मा.आयुक्त साहेब आता तुम्ही सांगीतलं त्याप्रमाणे आमच्या कंपनीचे काम हे चालु करून १६ तारखेला आज तीन महिने झाले आहेत. आता याच्यामध्ये काही चुका झालेल्या आहेत त्या आम्ही पण मान्य करतो .त्याच्यानंतर आम्हाला ज्या अटी आणि शर्ती सांगीतलेल्या होत्या आता जसे मॅडम बोलल्या जी.पी.एस कार्यप्रणाली आजच्या तारखेस कार्यरत झालेली आहे. दुसरे असे की सर्व सन्मा.नगरसेवकांनी तक्रारी केल्या कचरा उचलला जात नाहीये , घरोघरचे कलेक्शन होत नाहीये तर त्यानुसार आपल्या सुचनांचा आदर करुन दोन ते तिन दिवसांतच त्याच्यावर कार्यवाही करून आज जो कचरा साचलेला आले तो आम्ही शहरातुन उचलुन नेण्याची व्यवस्था केलेली आहे . ज्या घंटागाडया आम्हाला भेटलेल्या आहेत . त्यांच्या बाबतीत सुरूवातीला अडचणी आम्हाला आल्यात त्यांच्या साठी आम्ही रॅम्प बनविलेली होती ती रॅम्प जी आम्ही बनविलेली होती ती अतिवृष्टी मुळे खराब झाली त्याच्यामुळे आम्हाला प्रॉब्लेम आला . तर ते प्रॉब्लेम जे होते ते कंपनीचे होते मॅडम जर आम्ही काम घेतलेले आहे तर ती आमची जबाबदारी आहे कसे करायचे आणि कसे नाही करायचे . पण आता यांच्या नंतर जे झाले असेल ते ठिक आहे पण आता यांच्यानंतर तक्रारीची संधी देणार नाही अशी मी अपेक्षा करतो . त्याच्या नंतर सेल्फी चा विषय होता सेल्फी ही अटेंडंस ची सेल्फी काढण आम्ही चालु केलयं मॅडम त्याच्या नंतर ड्रेस आम्ही सर्वांना पुरविले आहेत . आणि आयुक्त साहेबांनी जी मिटींग घेतली होती स्वच्छ भारत अभियान अंतर्गत तर त्या मध्ये त्यांनी आम्हाला सर्व सांगीतले की सर्व प्रकारच्या सुविधा तुम्हाला द्याव्या लागतील . व साहेबांनी मी पण बोललो की हँड ग्लोज , मास्क व सर्व ज्या काही सुविधा असतील त्या सर्वच्या सर्व प्रोव्हाईड आम्ही करणार , त्याच्यानंतर बँक अकाऊंट जे तुम्ही बोलले . आम्ही सुरूवातीला जे लोक ज्वाईन झाले त्यांना सांगीतले होते त्यानुसार आमचे स्टेट बँकेशी बोलणे झाले होते . तर त्या बँकेचे अधिकारी असे म्हणाले की हे जे कर्मचारी आहेत यांचा पगार तुम्ही ११ वाजता टाकला की त्यांच्या बायका १ वाजता लाईनीत आलेल्या असतात आणि टोटल पैसे काढतात म्हणुन आम्हाला यांचे अकाऊंट नकोत. त्याच्यानंतर मॅडम आम्ही आय.डी.बी.आय बँकेशी बोललो , एच.डी.एफ.सी बँकेशी बोललो त्यानंतर सारस्वत बँक तयार झाली त्यांनी आपले अकाऊंट पण ऐक्सेप्ट केले . त्याचे पत्र आम्ही त्यांचे टोटल अकाऊंट उपायुक्त साहेबांना देणार आहोत.

**श्री.कुलभुषण पाटील :-** ज्याठिकाणी घंटागाडया जात नाहीत त्याठिकाणी लोटगाडया सुरु करा.

**श्री.प्रशांत नाईक :-** ज्या भागामध्ये म्हणजे स्लम भागामध्ये गाडया जात नाहीत त्या भागामध्ये सुरू करा .

**सौ.उज्ज्वला बेंडाळे :-** जे साहीत्यतुम्ही देणार आहात कामगारांना काही ठिकाणी छोटे पावडे असतात त्यांना मोठया दांडयाची जी पावडे असतात कारण तिथे रॅम्प वगैरे टाकलेले असतात तर तिथे कामगारांना अडचणी येत असतात.तर ती मोठी पावडे , काही विळे विळयांची कामे पडतात.तर त्यांना जे साहीत्य लागणार आहे. ते त्यांना सर्वच्या सर्व पुरविले गेले पाहीजे. दुसरे की घमेले असते ते काय ती प्लास्टीकची पोतडी राहाते त्याला ते दोरी बांधतात आणि ते घेवुन चलतात म्हणजे याच्यामुळे जे कामगार आहेत त्यांना काम व्यवस्थित करता येत नाही आणि मग ती रस्त्यावर सर्व घाण पडत राहते . आणि ती गटार काढली जाते तर ती लगेच भरली गेली पाहीजे ती दोन – तीन दिवस जशीच्या तशी राहाते. वाहन येईल आणि मग ती भरू मग ती परत गटारी मध्ये जाते व पाणी जात नाही . तर हया ज्याकाही छोटया छोटया गोष्टी आहेत तुम्ही तसेतर नाशिकला काम करता आहेत. नाशिकला जसे करता आहेत तसे आमच्या जळगांव शहराला पण करावं एवढी आम्ही सर्व् अपेक्षा करतोय . एक महिन्याची तुम्हाला संधी दिलेली आहे .

**शंतनू बोरसे , प्रतिनिधी (वॉटर ग्रेस) :-** आम्ही नक्कीच करू जळगांव शहर स्वच्छ भारत मध्ये येईल अशी मी कंपनी तर्फे तुम्हाला ग्वाही देतो .

मा.महापौर :- सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.
राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**
**(सिमा सुरेश भोळे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**